आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ३० मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२६०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 30 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-260 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


# ओळखपत्राशिवाय बदलता येणार दोन हजारांची नोट

## दिल्ली हायकोर्टाने याचिका फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी २००० रुपयांच्या नोटा बदलण्याच्या प्रकरणी मोठा निर्णय दिला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) आणि स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) च्या अधिसूचनांना आव्हान देणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. यामुळे आता ओळखपत्राशिवाय देशभरात २००० रुपयांच्या नोटा बदलता येणे सोपे होणार आहे.**



याचिकेत २००० रुपयांची नोट कोणत्याही ओळखापत्राशिवाय बदलण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. २३ मे रोजी नोट बदलण्याची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी एसबीआयने एका अधिसूचनेत म्हटले होते की, लोक बँकेच्या शाखेत जाऊन २००० रुपयांच्या १० नोटा बदलू शकतात. यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचे आयडी प्रूफ आणि रिक्वेस्ट स्लिप भरण्याची गरज नाही. न्यायमूर्ती सतीश चंदर शर्मा आणि न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद यांच्या खंडपीठाने सोमवारी भाजप नेते आणि वकील अश्विनी कुमार उपाध्याय यांची याचिका फेटाळून लावली. अश्विनी उपाध्याय यांनी आपल्या याचिकेत सेंट्रल बँक आणि एसबीआयचा हा निर्णय मनमानी, अतार्किक आणि घटनेच्या कलम-14 ( समानतेचा अधिकार ) च्या भावनेविरुद्ध असल्याचे म्हटले आहे. याचिकेवरील सुनावणीदरम्यान मध्यवर्ती बँकेच्या वतीने ज्येष्ठ वकील पराग त्रिपाठी यांनी युक्तिवाद केला. RBI ने २००० रुपयांच्या नोटा बदलण्याच्या प्रक्रियेला वैधानिक कायदा म्हटले आहे. ही 'नोटाबंदी' नसल्याचाही त्यांनी उल्लेख केला आहे. RBI ने २००० रुपयांची नोट बदलण्यासाठी ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत वेळ दिला आहे. तसेच त्यांची कायदेशीर निविदा काढल्याचेही स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.

म्हणजे २००० रुपयांच्या नोटेसह बाजारात अजूनही वस्तू खरेदी करता येणार आहेत. नोव्हेंबर २०१६ मध्ये ५०० आणि १००० रुपयांच्या नोटाबंदीच्या तुलनेत हा निर्णय वेगळा आहे. त्यावेळी चालू असलेल्या या नोटा केवळ चलनातून बाहेर आल्या नाहीत, तर त्यांची कायदेशीर निविदाही संपली होती, म्हणजेच ८ नोव्हेंबर २०१६ च्या मध्यरात्रीनंतर त्या नोटांची खरेदी करता येत नव्हती, तर २००० रुपयांच्या नोटांबाबत अशी कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही.

# इस्त्रोची पुन्हा चंद्रावर स्वारी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** इस्त्रोची महत्त्वकांक्षी मोहिम म्हणून चांद्रयान ३ कडे बघितले जात आहे. चंद्रावर अलगद यान उतरवणे आणि त्यामधून रोव्हरने बाहेर येत चांद्र भूमीवर संचार करणे अशी ही मोहिम असणार आहे. ही मोहिम यशस्वी झाली तर चंद्रावर रोव्हर धावणारा भारत हा जगातील चौथा देश ठरणार आहे. याआधी रशिया, अमेरिका आणि चीनने ही तंत्रज्ञानाची कमाल केली आहे.

२०१९ च्या जुलैमध्ये चांद्रयान २ मेहिमेत इस्त्रोने असाच प्रयत्न केला होता. एक उपग्रह चंद्राभोवती प्रक्षेपित केला होता, जो अजुनही चंद्राभोवती फिरत असून चंद्राचा नकाशा तयार करण्याचे तसंच चंद्रावरील खनिज-मुलद्रव्य, चंद्राभोवती असलेल्या अवकाशातील घडामोडींबद्दलची माहिती गोळा करत आहे. या मोहिमेत चंद्रावर 'विक्रम' नावाचा लँडर – यान उतरवण्याचा प्रयत्न केला. याच लँडरमधून 'प्रज्ञान' नावाचा रोव्हर बाहेर पडणार होता. मात्र विक्रम यान अलगद न उतरता चंद्रावर आदळले होते आणि त्याचे तुकडे झाले होते.

आता चांद्रयान ३ मोहिमेच्या माध्यमातून हाच प्रयत्न इस्त्रो करणार आहे. यावेळी सुमारे १७५२ किलो वजनाा लँडर हा चांद्र भूमीवर उतवण्याचा प्रयत्न इस्त्रो करणार आहे. यामध्ये २६ किलो वजनाचा रोव्हर नंतर चांद्रभूमीवर संचार करणार असं नियोजन आहे. इस्त्रोचा शक्तीशाली प्रक्षेपक, ज्याला बाहुबली यानावानेही ओळखले जाते अशा LVM3 मधून हे चांद्रयान ३ चंद्राकडे धाडले जाणार आहे. चंद्रावर लँडर-यान आणि रोव्हर उतरवत चांद्र भूमीचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याचा इस्त्रोचा प्रयत्न असणार आहे. एकुण १४ दिवस रोव्हर चंद्राच्या भूमीवरचा संचार करेल असेही नियोजन आहे. आत्तापर्यंत ही मोहिम कधी प्रत्यक्षात येणार याची फक्त चर्चा सुरु होती. आज ( सोमवारी ) इस्त्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी ही मोहिम जुलै महिन्यात प्रत्यक्षात येणार असल्याचं जाहिर केलं आहे. पण जुलै महिन्यात नक्की कधी याची घोषणा जरी केली नसली तरी १२ जुलै ला चांद्रयान ३ अवकाशात झेप घेणार असल्याचं सांगितलं जात आहे. तर सर्व काही सुरळीत झाले तर २३ ऑगस्टला चांद्रयान ३ मधील लँडर हे चंद्रावर उतरवण्याचा प्रयत्न असणार आहे.









# ड्रेसकोड वादावर भुजबळांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** तुळजापूर मंदिरात ड्रेसकोड लागू करण्यात आला होता. त्यानंतर भाविकांनी आक्षेप घेतल्यावर हा निर्णय चोवीस तासांमध्ये मागे घेण्यात आला. यावर छगन भुजबळ यांनी रोखठोक भूमिका मांडली आहे. तसंच मंदिरातले पुजारी उघडे का असतात ? असाही प्रश्न त्यांनी विचारला आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाने मंदिरांमध्ये वस्त्र संहिता ( ड्रेस कोड ) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या सप्तश्रृंगी देवी मंदिरात येणाऱ्या भाविकांना वस्त्रसंहिता लागू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यावर मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करणे हा मूर्खपणा आहे, अशी जोरदार टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केली आहे. मंदिरात जाताना शाळेला सुट्टी आहे. तो हाफ पँट घालूनच मंदिरात जाणार ना ? त्या मुलाला हाफ पँट घातली म्हणून बाहेर काढण्यात आलं. हा तर मूर्खपणा आहे. तुम्ही अगदी वाट्टेल तसे कपडे घालून मंदिरात जाऊ नये हे मलाही मान्य आहे. पण अगदी सगळ्यांनीच नियम पाळायाचा असेल तर मंदिराच्या गाभाऱ्यात जे उघडेबंब असणारे पुजारी असतात त्यांनीही सदरा वगैरे घालावा. गळ्यात माळ घातल्यावर कळेल हा पुजारी आहे. पुजारीही अर्धनग्नच नसतात का ? धोतर नेसावं, तुळशीमाळा घालाव्यात, सदरा घालावा त्यावरुन ओळखू येईल की हा पुजारी आहे. पण नाही ते उघडेच पाहिजेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपावरून तसेच पुणे लोकसभा कोण लढवणार ?, यावरून मविआत धुसफूस सुरू असल्याचे दिसत आहे. काँग्रेसचे बाळासाहेब थोरात तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार या दोन्ही नेत्यांनी या जागेवर दावा सांगितला आहे. त्यावर भाष्य करताना छगन भुजबळ म्हणाले, जागावाटपाची चर्चा मीडियात करण्याची गोष्ट नाही. तिन्ही घटक पक्षांना विश्वासात घेऊन याबाबत आम्ही चर्चा करू. तसेच, कर्नाटकमध्ये भाजपचे जे पानिपत झाले आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तसंच प्रसन्न, टवटवीत तुम्हीही राहावं असं आम्हाला वाटतं. तुम्हीही आपला दिवस आपले निहित कार्य, चांगली कामं करण्यात घालवावा. तोही आम्हाच्यासारखा प्रसन्न, हसतमुख आणि टवटवीतपणे. आणि जमलं तर सुगंधाची उधळण करावी. तुमच्या कर्तृत्वाचा सुगंध परिसरात दरवाळावा असं आम्हाला वाटतं.'
मी म्हटलं, ' अहो, थांबा थांबा. जीवनाचं सारं तत्वज्ञानच तुम्ही उलगडून सांगितलंत. तुमचे हे शब्द मला माझ्या अंतरंगात साठवू द्या.' खरंच रोजची पहाट म्हणजे आमच्यासाठी त्या विधात्यानं दिलेलं अमूल्य वरदान आहे. प्रत्येक दिवस आमच्या आयुष्यातील सोनेरी पान आहे. कधी ऊन, वारा, पाऊस असेल. वादळे झेलावी लागतील. थंडीचा कडाका असेल. फुलं उमलण्याची थोडीच थांबली आहेत. त्यांना माहिती आहे की आपल्या या छोट्याशा आयुष्यात संकटे, सुखदुःख येणारच ! त्यासाठी उमलण कशाला सोडायचं ? कोमेजायचं कशाला ? दुर्मुखलेलं का राहायचं ? जमेल तसं फुलून यायचं. आपल्या सुगंधाची बरसात करायची.
फुलांचं मनोगत समजून घेता घेता शीतल सुगंधी वायू लहरी कानाशी येऊन गुणगुणू लागल्या.'
अरे, रोजचा दिवस म्हणजे सगळ्या गेलेल्या इतर दिवसांसारखाच एक असतो का ? कदाचित तुला तसं वाटेल. पण आपल्या आयुष्यातला प्रत्येक दिवस आगळावेगळा असतो. जे काल होतं ते आज नाही. आणि जे आज आहे ते उद्या असणार नाही. बदल हा सृष्टीचा स्थायीभाव असतो. म्हणूनच या बदलाला रोज नव्या उत्साहानं, उमेदीनं सामोरं जायचं असतं. तुला माहिती असेलच की आम्ही सदा सर्वकाळ वाहत असतो. कधीही थांबत नाही. आम्ही थांबलो तर ही सृष्टी थांबेल. तुझ्या श्वासात आणि रोमारोमात आम्ही असतोच. तेव्हा मित्रा, या सकाळच्या प्रसन्न वेळी मोकळा प्रसन्न श्वास घे. आपल्या तनामनात नवीन ऊर्जा भरून घे आणि आजच्या दिवसाला सामोरा जा.
' मी वाऱ्याच्या लहरींना म्हटलं, ' अगदी खरं आहे तुमचं. तुम्ही आमचा प्राण आहात. जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत सोबत असते तुमची. तुमचा संदेश मी लक्षात ठेवीन. नवीन ऊर्जेनं भारून माझ्या कामाला सुरुवात करीन. तेवढ्यात फुलाफुलांवर नाचणाऱ्या, बागडणाऱ्या फुलपाखरांकडे माझं लक्ष गेलं. त्यांचे विविध रंग मनाला प्रसन्न करीत होते. त्यातलं एक डोळे मिचकावीत म्हणालं, ' आमचंही थोडं ऐकशील का रे ?' मी म्हटलं, 'जरूर. आज तुम्ही सगळेच मला अतिशय सुंदर संदेश देत आहात. तुमचं मला ऐकायचंच आहे.'






## आनंदी पहाट

## तणावग्रस्त जीवनामुळे शारीरिक व्याधी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

तुम्हाला ज्या बाबी अनेक दिवस, काही आठवडे किंवा त्याहूनही अधिक काळ त्रास देत असतील, तर तुमच्या मनात नकारात्मक विचार येत आहेत हे निश्चितच सत्य आहे. नकारात्मक विचारांमुळे तुम्ही उदास आणि चिंताग्रस्त होऊ लागता. राग ही देखील एक नकारात्मक भावना आहे ज्यामुळे आपल्या आरोग्यावर आणि मानसिकतेवर सर्वात मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. विशेषतः रागावर सहजपणे नियंत्रण न मिळवू शकणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत ते प्रकर्षाने जाणवते. तीव्र वेदना आणि जुनाट आजार असलेल्या लोकांमध्ये रुमिनेशन सामान्य असू शकते, त्या वेदनांबद्दल नकारात्मक विचारांचे रूप धारण करणे आणि त्यातून बरे होणे हे देखील शक्य होऊ शकते. सामान्यांमध्ये तणावग्रस्ततेमुळे डोकेदुखी, मायग्रेन, सायनसवर परिणाम करणारी परिस्थिती आणि कानाचे संक्रमण यांचा समावेश होतो. असामान्य किंवा गंभीर डोकेदुखी, रक्तदाब हे कधीकधी गंभीर वैद्यकीय स्थितीचे लक्षण असते. काहीवेळा अगदी सामान्य सर्दी, थकवा, तणाव, भूकेने होणारी व्याकुळता, झोपेची कमतरता, अगदी ॲलर्जीमुळे तुम्हाला उदासीनता येऊ शकते, त्यामुळे नकारात्मक विचार येतात. अशा प्रकारच्या अनेक कारणांमध्ये, नैराश्य हे नकारात्मक विचारांमुळेच उद्‌भवू शकते. सामान्य नकारात्मक संदेशांची काहीजण स्वतःच वारंवार पुनरावृत्ती करत असतात. काहीवेळा त्यांचे विचार असे असतात कि,मी स्वतःच एक धोकादायक व्यक्ती आहे मी एक पराभूत व्यक्ती आहे मी कधीही काहीही बरोबर करत नाही कोणीही मला कधीही आवडणार नाही, मी एकमेव असा आहे कि जो अविचाराने वागतो बहुतेक व्यक्ती या स्वरूपातील नकारात्मकता निर्माण करणाऱ्या विचारांवर, संदेशांवर, ते कितीही असत्य किंवा अवास्तव असले तरीही विश्वास ठेवतात.




आधुनिक केसरी

### आत्मा बोले विठ्ठलाशी ||

रूप गोजिरे सावळे | मन सुखाचे सोहळे ||१||
विकारांची नको बाधा | माझा भाव भोळा साधा ||३||
काया वाचा स्थिर बुध्दी | झाली शांत आत्मशुध्दी ||४||
दास ज्ञाना-तुकोबांचा | लळा लागे अभंगाचा ||४||
श्वास टाळात गुंतला | देह वारीत नचला ||५||
मौन होता मी जगाशी | आत्मा बोले विठ्ठलाशी ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

सुहास्यवदनामम्बां
चारुनयनशोभिताम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| १० || सुहास्यवदन, सुंदर नयनांनी सुशोभित अशा अम्बेला, दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सृष्टि में देख विचित्रता,
कर्म है कारण सोय ।
संचित अरु क्रियमाण है, प्रारब्ध क्रिय
होय ।।४९।।(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय) ०५/१२/४९

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
सृष्टीच्या विचित्रतेचे म्हणजेच विविधतेचे कारण कर्म आहे. संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण असे तीन प्रकारचे कर्म असतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## मूळपरमात्म स्वरूप

आधुनिक केसरी

ज्या प्रमाणे वायुला आकार नाही रंग नाही त्या प्रमाणे मूळमाया आहे. कधीतरी आपणही लहान होऊन पहावे बघा तर मग कसा निरागस आनंद मिळतो ते जसे की लहानमूल म्हणते की मला थंडी वाजते! आपण त्याला चेष्टेने म्हणतो की तुला थंडी वाजते आहे मग थंडी वाजल्याचा आवाज काही आला नाही. हा झाला गमतीचा भाग पण मित्रांनो वायु वाहू लागला की तो आहे असा भास होतो. पण त्याला अमूक एक रूप आहे असे दाखवता येत नाही. त्याच प्रमाणे मूळमाया आहे पण ती भासते समजते पण तिचे ठोस असे रूप दाखवता येत नाही. ती पहायची असेल तर आपल्याला ती धूळ रूपात दिसते. त्याच प्रमाणे मूळमाया आपले अस्तित्व दाखवते. पण जाणवून दिसत मात्र नाही. द्रयुष्य पदार्थाच्या रूपाने माया व अविद्या दिसते. मूळमायेच्या संयोगाने निर्गुण ब्रम्हस्वरूपामध्ये संपूर्ण जग दिसू लागते. मूळ परब्रम्ह अद्रुष्य, निराकार, निर्गुण व सुक्ष्म आहे.त्यात निर्माण झालेली मूळमाया त्याच सद्विचारांनी द्रुष्य आकार, सगुण वस्तू बद्दल स्थुल पदार्थाच्या रूपात दाखवते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

येऊं द्या जी कांहीं वेसकरास । आंतून बाहेर वोजेचा घास ॥१॥
जों यावें तों हात चि रिता नाहीं । कधीं तरीं कांहीं द्यावें घ्यावें ॥२॥
तुका म्हणे उद्यां लावीन म्हनेरा । जे हे दारोदारांभोंवतीं फिरा ॥३॥

## निवडक सुभाषिते


आधुनिक केसरी

तक्षकस्य विषं दंशे मक्षिकायाच मस्तके
। वृश्चिकस्य विषं पुच्छे सर्वांगे दुर्जनस्य तत् ॥
स्पष्टीकरण - या श्लोकाचा रोख दुर्जनांकडे आहे. कोणत्याही परिस्थितीत दुर्जनांपासून सावध राहावे असे यात सांगायचे आहे. दुर्जन हा शरीर, मन, वाणी, बुद्धी या सर्वांगांनी विषारी असतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

## निश्चयपूर्वक नामस्मरण आणि चित्तशुद्धी

आधुनिक केसरी



मला अजून अमुक करायचे आहे ही कल्पना सोडून द्यावी. आता मी परमेश्वराचा झालो, आता मला काही करायचे राहिले नाही, अशी मनाची स्थिती झाली पाहिजे. 'हे परमेश्वरा, आता तुझ्याकरताच मी जगेन, तुझ्या नामस्मरणाशिवाय मला काही कर्तव्य उरले नाही.' असा निश्चय केला तर मनाला समाधान झालेच पाहिजे. 'नामस्मरण होत नाही, कारण वयामुळे मन थकले,' हे म्हणणे बरोबर नाही. शरीर थकेल, कारण लहानपणी वाढणे आणि वृद्धपणी थकत जाणे, हा शरीराचा निसर्गक्रमच आहे; परंतु मन थकले हे मात्र सयुक्तिक नाही. मन हा परमेश्वराचा अंश आहे, असे आपल्या दिव्य विभूती सांगताना भगवंतांनी सांगितले आहे. मनाची अत्यंत क्षीणतेची अवस्था म्हणजे मृत्युसमयीची; परंतु त्या समयीही माझे स्मरण ठेवावे असे भगवंतांनी सांगितले असताना, त्यापूर्वी केव्हाही, मन थकले आणि स्मरण करू शकत नाही असे होणे शक्य नाही. पूर्वी सहा-सहा तास बसून जप केलेला असेल, तितका आता होत नसेल, तितके बसवणार नाही. मध्ये-मध्ये झोप लागत असेल, हे मान्य आहे; पण स्मरण राहू शकत नाही असे नाही होणार. मन थकले ही खरी अडचण नसून मनाचा इतर व्याप फार आहे हे खरे कारण आहे. तेव्हा, सर्व व्यापांतून आणि काळजीतून लक्ष काढून ते भगवंताकडे लावणे जरूर आहे. पैसाअडका, प्रपंचातल्या सर्व गोष्टी, यांचा मनाने त्याग करावा. असा त्याग केला तर कार्यभाग निश्चित होतो हे मी खात्रीने सांगेन.

पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा, माणसाला भगवंतापासून दूर नेतात; त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे, त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत. धर्माचरण, भगवद्‌भक्ती, नामस्मरण आणि सत्संग हे चित्तशुद्धीचे उपाय होत. किंवा एकाच शब्दात असे म्हणता येईल की, सत्संग हाच याला तोडगा आहे. चित्तशुद्धीचे लक्षण हे की, आपल्यासारखेच सर्व जग सुखी असावे ही भावना असणे. ही भावना वाढण्यासाठी, 'सर्व जग सुखी असावे' अशी प्रार्थना करण्याचा नेहमी परिपाठ ठेवावा, म्हणजे हळूहळू भगवत्कृपेने साधेल. अभिमान हा मात्र चित्तशुद्धीत बिघाड करणारा आहे, आणि तो केव्हा डोके वर काढील आणि घात करील याचा पत्ता लागणार नाही. पण भगवंताच्या स्मरणामध्ये अभिमानाचे मरण आहे. म्हणून आपण भगवंताचे स्मरण अखंड टिकवूया आणि आनंदाने राहूया. **आजचे बोधवचन आहे - नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही अशी दृढ भावना करावी. श्रीराम समर्थ**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ३० मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# छंद दीपस्तंभासारखे मार्ग दाखविणारे : सुधीर कोर्टीकर

## स्व.मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेतील पुष्प गुंफतानाचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ , मुंबई आणि स्व.मोहनलालजी बियाणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती संभाजी नगर मधील सिडको एन-४ च्या कै.नारायणराव उजळंबकर वाचनालयात स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेचे दहावे पुष्पाचे आयोजन करण्यात आलेले होते.
सुप्रसिद्ध साहित्यिक सुधीर कोर्टीकर यांनी कला गुण छंदाचे महत्व या विषयावर स्व.मोहनलालजी बियाणी यांच्या व्याख्यान मालेचे दहावे पुष्प गुंफले तर व्याख्याना बरोबरच सुधीर कोर्टीकरांनी त्यांचा दुर्मिळ नाणी आणि टपाल तिकीटांचे प्रदर्शन आयोजित केलेले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत आणि निवृत्त प्राचार्या सुनीता चंद्रशेखर पाठक यांनी केले होते. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेतून यावर्षा पासुन स्व. मोहनलालजी बियाणी ( .काकाजी ) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या वर्षीपासून या व्याख्यानमालेचा प्रारंभ करण्यात आलेला आहे. व्याख्यानमालेच्या बरोबरच आयोजित केलेल्या दुर्मिळ नाणी आणि टपाल तिकीटांचे प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर ज्येष्ठ





विचारवंत व माजी प्राचार्या सुनीता चंद्रशेखर पाठक म्हणाल्या आज घरातील आई बाबां मुलांवर चांगले संस्कार करण्यास कमी पडतं आहेत. पूर्वी मुलांकडून पालक पाढे , श्लोक , शुभंकरोती , असं रोज म्हणून घेतं होते. वडीलधारी मंडळीचा आदरकरुन त्यांच्या कडून आशीर्वाद घ्या...साऱ्यांचाच विसर पडत चालला आहे.वॉटसॉप , फेसबुक , सोशल , नेटवर्किंग यामधे आजची पिढी बुडत चाललेली आहे.आई.. वडिलांच्या संस्काराचा विसर पडला आहे.त्यामुळेच वृद्धाश्रमात गर्दी झालेली आहे...हे चित्र बदलण्यासाठी चांगले संस्कार करणे गरजेचे आहे. स्व.मोहनलाल बियाणी यांच्या व्याख्यान मालेचे दहावे पुष्पात कला गुण छंदाचे महत्व या विषयावर बोलताना सुप्रसिद्ध साहित्यिक सुधीर कोर्टीकर मार्गदर्शन करताना म्हणाले. आजच्या संगणक युगात प्रत्येक विद्यार्थी हा अधिक गुण मिळवण्यासाठी धावत आहे. आपणं ज्ञानसंपन्न जरुर व्हावयास हवं आहे. पण त्याच बरोबर कलासंपन्न होणे गरजेचे आहे.एखादी तरी कला गुण छंद हा प्रत्येक विद्यार्थ्यांनी जोपासायला हवाच. एखादा तास नियमित आपल्या कलेसाठी... छंदासाठी द्यावयास हवा.याच छंदातून मिळणारी एकाग्रता ही आपणास आभ्यासात उपयोगी पडते नी आपले गुण वाढण्यास मदत करतात. आपणं जोपासलेले हे कला गुण छंद पुढील जीवनात एखाद्या दीपस्तंभा सारखे आपणास मार्ग दाखविणारे ठरतात हे बाकी खरं... संपूर्ण व्याख्यान मालेचे आयोजन संयोजन आणि सूत्रसंचालन हे दैनिक आधुनिक केसरीचे संपादक डॉ.प्रभू गोरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक भाषणात प्रभू गोरे म्हणाले स्व.मोहनलालजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आम्ही अशा व्याख्यानं मालांचे आयोजन संपूर्ण मराठवाड्यात करीत आहोत.त्याला उदंड प्रतिसाद मिळात आहे. सोशल मीडियावर पार बुडालेल्या आजच्या विद्यार्थ्यांसाठी अशा व्याख्यानं मालांचे नितांत गरज आहे.याचाच विचार करून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेतून यावर्षा पासुन अशा व्याख्यानं मालांचे आयोजन आम्ही संपूर्ण मराठवाड्यात करीत आहोत.यामधूनच चांगल्या विचारांचे.. चांगल्या संस्कारांची बीजं नव्या पिढीच्या मनात रुचली जातील...पुढे तेच संस्कार फुलतील..बहरतील..मुलांचे जीवन आनंदमय सुखमय सुजलाम सुफलाम होईल हे निश्चित... व्याख्यानाला उदंड प्रतिसाद मिळाला होता.आलेल्या विद्यार्थ्यांनी व ज्येष्ठ नागरिकांनी
सुधीर कोर्टीकर यांनी आयोजित केलेल्या दुर्मिळ नाणी, नोटा व टपाल तिकीटांच्या प्रदर्शनांचा देखील आनंद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक आधुनिक केसरीचे संपादक प्रभू गोरे यांनी केले. सुधीर कोर्टीकरांचे स्वागत अनंत पवार यांनी केले तर उद्घाटकांचे स्वागत श्रीमती.साधनाताई शहाणे यांनी सुगंधी फुलांची कुंडी देवून केले.ज्येष्ठ साहित्यिक प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी छोटेखानी भाषणा नंतर आभार प्रदर्शन केले. कै.नारायणराव उजळंबकर वाचनालयात आयोजित केलेल्या स्व.मोहनलाल बियाणी यांच्या व्याख्यान मालेस मोठ्या संख्येने विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.या कार्यक्रमासाठी दैनिक आधुनिक केसरीचे मुख्य व्यवस्थापक संजय व्यापारी तसेच वाचनालयाच्या ग्रंथपाल राजश्री बाविस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी अनंत पवार, राम मिंड , साधनाताई शहाणे, नयन कोर्टीकर, डॉ. शामसुंदर कुडे , राजश्री बाविस्कर, प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी, मिनल किशोर बाविस्कर, डॉ. सुभाष पोफळे, आर.आर. खंडेलवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

# विदर्भ, महाराष्ट्र, मराठवाड्यात ३१ मेपर्यंत पावसाचा तडाखा

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** मे महिन्याच्या अखेरीस तापमानाचा पारा खाली येत असला तरी उष्णतेच्या झळा मात्र अजूनही कायम आहेत. त्यातच आता मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार विदर्भ, महाराष्ट्र, मराठवाड्यात ३१ मे पर्यंत पावसाचा तडाखा बसेल. महाराष्ट्रासह इतरही काही राज्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. मुंबई, कोकण किनारपट्टी भागात मात्र हवेतील आर्द्रतेचे प्रमाण कमी झाले नसल्यामुळे नागरिकांना उकाडा सहन करावा लागत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील ४८ तासांत पुन्हा एकदा हवामान बदलांची नोंद केली जाणार आहे. यावेळी बहुतांश भागांना पावसाचा तडाखा बसू शकतो. सध्या मान्सूनची वाटचाल सकारात्मक मार्गाने सुरू असून कोणताही अडथळा न आल्यास बंगालच्या उपसागरातून तो वेगाने पुढे सरकण्याची शक्यता आहे. एकीकडे हवामान खात्याकडून देशातील बहुतांश भागांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली असतानाच दुसरीकडे काही राज्यांमध्ये वादळी वाऱ्यांचा तडाखा बसणार असल्याचीही शक्यता आहे.

# तालुका कृषी अधिकारी काळे यांची बदली

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुका कृषी अधिकारी यांची छत्रपती संभाजीनगर येथे सामान्य



प्रशासन यांच्या आदेशान्वये कृषी,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागातर्फे जिंतूरवरून छत्रपती संभाजी नगर येथे पदोन्नती वर बीज प्रशिक्षण अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली आहे. काळे यांनी जिंतूर येथे जवळपास 5 वर्ष कार्यक्षम अधिकारी म्हणून यशस्वीपणे आपली कृषी अधिकारी पदावरील कारकिर्द जिंतूर येथे पार पाडली. वरिष्ठ अधिकारी,कार्यालयीन कर्मचारी व शेतकरी यांच्याशी नेहमी समन्वय साधत चोख पाच वर्षे सेवा त्यांनी बजावली. त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्या बदल त्यांचा सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे. विशेषतः सोयाबीन बियाणे उत्पादन ग्रामबीजोउत्पादन मोहीम मध्ये त्यांनी विशेष भरीव योगदान दिले होते.

# 'प्रकाश आंबेडकरांनी भाजपबरोबर यावे'

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी येथे रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठक पार पडली. या बैठकीत बोलताना रामदास आठवले यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांना भाजपाबरोबर येण्याची ऑफर दिली आहे. "प्रकाश आंबेडकर यांनी इकडं तिकडं फिरू नये. मी तुम्हाला भाजपाबरोबर घेऊन जातो," असं रामदास आठवले म्हणाले. ३२ राज्यात रिपब्लिकन पक्ष काम करत आहे. प्रत्येक राज्यात पक्ष वाढवण्याचं काम सुरू आहे. आपल्याला महाविकास आघाडीबरोबर संघर्ष करायचा आहे. रिपब्लिकन पक्ष ज्यांच्या बाजूने असतो, त्यांनाच सत्ता मिळते. प्रकाश आंबेडकर आमचे नेते आहेत. प्रकाश आंबेडकर सांगतात की वंचित आघाडी ज्यांच्याबरोबर असते, त्यांना सत्ता मिळते. वंचित आघाडी स्वतःच्या जीवावर निवडणूक लढते आणि पडतात," असं रामदास आठवलेंनी म्हटले. वंचित आघाडीच्या पाठिंब्याने कोणाची सत्ता आली नाही. माझ्या पक्षाच्या पाठिंब्याने काँग्रेस, भाजपा आणि शिवसेनेची सत्ता आली. त्यामुळे प्रकाश आंबेडकरांनी इकडं तिकडं फिरू नये. मी तुम्हाला भाजपाबरोबर घेऊन जातो.



# कपिल सिब्बल यांची टीका

आधुनिक केसरी

नव्या संसद भवनाचे रविवारी उद्घाटन झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते हे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंना बोलवण्यात आले नाही म्हणून काँग्रेससह १९ विरोधी पक्षांनी या कार्यक्रमावर बहिष्कार घातला होता. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातल्या आरोपांच्या फैरी होत आहेत. या अजूनही थांबलेल्या नाहीत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कपिल सिब्बल यांनी सेंगोलवरुन पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. कपिल सिब्बल यांनी एक ट्वीट करत तुम्ही सांगत असलेला सेंगोलचा अर्थ आम्हाला मान्य नाही असे कपिल सिब्बल यांनी म्हटले आहे. माजी केंद्रीय मंत्री आणि राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी नव्या संसदेचे उद्घाटन केल्यानंतर एक ट्वीट केले आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते सेंगोलला ब्रिटिशांकडून सत्ता हस्तांतरणाचा समानार्थी शब्द मानतात. मात्र, तसे नाही. शक्य झाल्यास माझे म्हणणे ऐका. भारतात सत्तेचे हस्तांतरण त्या लोकांच्या इच्छेने झाले ज्यांनी स्वतः हे संविधान दिले. देवी मीनाक्षी यांनी मदुराईच्या राजाला भेट दिलेले सेंगोल हे राज्य करण्याच्या दैवी अधिकाराचे प्रतीक होते, असे सिब्बल यांनी म्हटले आहे. देशाला २८ मे रोजी नवे संसद भवन मिळले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवीन संसद भवनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुरोहितांनी वैदिक मंत्रोच्चारांमध्ये पंतप्रधान मोदींना सेंगोल म्हणजेच राजदंड सुपूर्द करण्यात आला. राजदंड हातात घेण्याआधी पंतप्रधान मोदींनी राजदंडाला दंडवत घातला. यानंतर त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासोबत नवीन संसद भवनात राजदंडाची स्थापना केली. जुन्या संसदेत लोकसभेत ५४३ खासदार बसू शकत होते, तर नव्या संसदेत ८८८ खासदार बसू शकतील अशी व्यवस्था आहे. तर राज्यसभेत सध्याची २५० ची क्षमता वाढवून ३८४ करण्यात आली आहे. राजाने किंवा एखाद्या राजसत्तेने धारण केलेल्या दंडाला 'राजदंड' असे म्हणतात.



प्रा. दयानंद जाधवर
संपर्क क्र. 8668602215

# मोदी सरकारची बौद्धिक दिवाळखोरी

आधुनिक केसरी

**२० मे २०२३ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने एक परिपत्रक काढले. ज्यामध्ये २००० च्या नोटा ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत रद्द करण्यात येतील. मुळामध्ये जेव्हा नोटबंदी - २ हा बिनडोक निर्णय सरकारने घेतला या निर्णयाला या देशातील त्या राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी मोदींचा 'मास्टर स्ट्रोक' म्हणतात हे त्यांच्या बुद्धीचे लक्षण. ८ नोव्हेंबर २०१६ ला भारत सरकारने चलनातील ८५% नोटा परत घेण्याचा निर्णय घेतला. एका रात्रीत ५०० आणि १००० च्या नोटांवर बंदी घातली. या निर्णयाला आज ६ वर्षं पूर्ण झाली आहेत. काळा पैसा परत आणणं आणि बेहिशेबी संपत्तीच्या विरोधात हे पाऊल असल्याचं तेव्हा सरकारने स्पष्टीकरण दिलं होते. अर्थव्यवस्थेच्या बाहेर जो काळा पैसा होता ते परत आणण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं सरकारचं मत होतं.**






या पैशामुळे भ्रष्टाचार आणि इतर बेकायदेशीर कृत्यांमध्ये वाढ होते. हा पैसा करउत्पन्नाच्या अंतर्गतही येत नाही. ज्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात रोख पैसा आहे त्यांना या पैशाच्या बदल्यात नवीन नोटा घेण्यासाठी अडचण निर्माण झाली. मात्र ऑगस्ट २०१८ मध्ये रिझर्व्ह बँकेने प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार नोटबंदीपूर्वी चलनात असलेल्या ९९% नोटा बँकांमध्ये पुन्हा जमा झाल्या. या अहवालाबाबत सगळीकडे आश्चर्य व्यक्त करण्यात आलं होतं आणि टीकाही झाली होती. त्यानंतर या देशाची आर्थिक घसरण सुरू झाली. संमिश्र परिणाम अर्थव्यवस्थेवर पाहायला मिळाले. या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणारी लघुउद्योग, शेती, कुटिरोद्योग रसातळाला पोहोचला. त्याचा अनुभव आपण सर्वांनी घेतला आहे. या निर्णयामुळे आतंकवादावर हल्ला करता येईल, नक्षलवाद संपवता येईल, काळा पैसा परत घेतला जाईल अशा बऱ्याच राजकीय वल्गना त्या वेळी अनेक बड्या नेत्यांनी केल्या. ५० दिवसांत काळा पैसा आला नाही तर भर रस्त्यावर मला फासावर लटकवा अशा राजकीय घोषणादेखील करण्यात आल्या. पंतप्रधानांनी तर जपानमध्ये जाऊन भाषणात त्याची टिंगल-टवाळी देखील केली "लग्न आहे, पण घरात पैसेच नाहीत" अशी हसत हसत टिंगल केली. कॅशलेस अर्थव्यवस्था करायची हे स्वप्न घेऊन पेटीएम सारख्या खासगी कंपन्यांची जाहिरात या देशाच्या पंतप्रधानांनी केली. नोटबंदीमुळे डिजिटल व्यवहारांमध्ये वाढ झाली का ? या प्रश्नाचं रिझर्व्ह बँकेकडे ठोस उत्तर नाही. कॅशलेस व्यवहारांचं प्रमाण गेल्या काही काळापासून वाढत असलं तरी २०१६ पासून त्यात वाढ झाली आहे. मात्र ही वाढही काही काळानंतर स्थिरावली. नंतरच्या काळात जी वाढ झाली ती सरकारी धोरणांमुळे नाही तर तंत्रज्ञानातील बदलांमुळे झाली आहे. हे सगळं झालं. मग १००० च्या नोटांमध्ये अधिक काळा पैसा लपवता येतो म्हणून त्या नोटा रद्द करून २००० च्या नव्या नोटा छापण्यात आल्या आणि परत २०१८ नंतर त्याही छापणे बंद करण्यात आले.

त्यामुळे आपोआपच २००० च्या नोटांचे सर्क्युलेशन कमी झाले. आजमितीला दोन हजारच्या चलनी नोटांची एकूण किंमत आहे ३ लाख ६२ हजार कोटी रुपये आणि एकूण चलनातील नोटांची रक्कम किंवा किंमत आहे ३० लाख कोटी रुपये आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये जिथे अजूनही खरेदी विक्री करताना रोखतेचा वापर केला जातो तिथे ही रक्कम खूप मोठी आहे. अचानक चलन रद्द करण्यात आल्यामुळे अर्थव्यवस्थेला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. आरबीआय ने एक परिपत्रक काढून जाहीर केलं की एक व्यक्ती एका दिवसाला फक्त दोन हजारांच्या दहा नोटाच बदलू शकते म्हणजे वीस हजार एवढीच रक्कम ती बदलू शकते. म्हणजे आरबीआयने एकाप्रकारे सरकारचे जे प्रवक्ते म्हणत होते की "हा मोदींचा मास्टरस्ट्रोक आहे", त्यांच्या थोबाडीत मारली. जे बोलत होते की काळा पैसा बाहेर येईल, परंतु जे परिपत्रक आहे त्यात असा स्पष्ट उल्लेख कुठेही नाही की जी व्यक्ती पैसे बदलण्यास येईल तिची माहिती घेतली जाईल. जसे नाव, पत्ता, रक्कम इत्यादी. मग हे पुढारी काळा पैसा शोधणार कसा होते ? समजा एका व्यक्तीने पाच जणांकडे प्रत्येकी २० हजार रुपये बदलण्यासाठी २००० च्या नोटा दिल्या तर ती दिवसाला एक लाख रुपये आरामात बदलेल. या नोटा बदलण्याची शेवटची तारीख ३० सप्टेंबर आहे. म्हणजे २० मे पासून ३० सप्टेंबर हे दिवस म्हणजे सुमारे १२० ते १३० दिवसांचा कालावधी आहे. म्हणजे एक व्यक्ती दिवसाला पाच लोकांकडून दर दिवशी १ लाख याप्रमाणे १ कोटी २० लाखांपेक्षा अधिक रुपये या दिवसांमध्ये बदलू शकते. मग हा सगळा अट्टाहास कशासाठी ? अशा पद्धतीने देशाची अर्थव्यवस्था चालते का ? जगात लोकशाही असणारे अनेक देश आहेत. ज्यांची लोकशाही राज्यव्यवस्था आधुनिक भारतापेक्षा प्राचीन आहे. ज्यामध्ये इंग्लंड ८५० वर्षे, अमेरिका २७५ वर्षे, फ्रान्स २५० ते ३०० वर्षे. जगात लोकशाही असणाऱ्या अनेक देशांमध्ये कुठल्याही शासनाने नोटबंदी केली नाही. जगात फक्त दोन वेळेसच नोटबंदी करण्यात आली ( अवमूल्यन नव्हे ). आधुनिक युगामध्ये जर्मनीचा हुकुमशहा हिटलर याने पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीमध्ये नोटबंदी केली होती. याचा गंभीर परिणाम जर्मनीच्या अर्थव्यवस्थेला भोगावा लागला होता. तसेच मध्ययुगीन भारतामध्ये मोहम्मद तुघलक याने नोटबंदी केली होती. त्याला इतिहासात वेडा तुघलक असे म्हटले आहे. ( वाचक सुजाण आहेत. ) आज जग एक छोटे खेडे बनले आहे, असे आपण म्हणतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराशिवाय जगणं अशक्य आहे. वेगवेगळ्या देशांसोबत संबंध प्रस्थापित करायचे असतात त्या वेळी एक देश दुसऱ्या देशांसोबत संबंध प्रस्थापित करत असताना, वृद्धिंगत करत असताना त्या देशाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, राजकोषीय स्थैर्य कशा प्रकारचे आहे हे पाहूनच संबंध स्थापित करत असतात. रशियाकडून भारत भारतीय चलनामध्ये खनिज तेल आयात करणार अशी चर्चा झाली. परंतु काही दिवसांतच हा निर्णय रद्द करण्यात आला. त्याचं कारणसुद्धा सरकारची असणारी अस्थिर अर्थनीतीच आहे. जर शासन असा अस्थिर निर्णय घेत असेल तर रशियन कंपन्यांनी काय आरबीआय कडे येऊन रांगेत उभे राहून नोटा बदलायच्या होत्या का ? तीच परिस्थिती नेपाळमध्ये झाली. २०१६-१७ रोजी भारताने नोटबंदीची घोषणा केली आणि ५०० व १००० च्या नोटा चलनातून रद्द केल्या. त्या नोटा आजतागायत भारत सरकारने नेपाळला बदलून दिलेल्या नाहीत. यामुळेच भारत आणि नेपाळचे आर्थिक आणि राजकीय संबंध बिघडले आणि नेपाळने चीनला व्यापारासाठी आपले दरवाजे उघडे करून दिले. माझ्या नजरेतून ही एक अत्यंत गंभीर आणि निंदनीय घटना आहे. एक अर्थतज्ज्ञ आहेत ज्यांनी देशाच्या महसूल खात्यात काम केलं आहे. त्यांनी असं विधान केलं की "आपली बौद्धिक दिवाळखोरी भारताने जगाला दाखवून दिली आहे". सरकारच्या या निर्णयाबद्दल देशातील जनतेने नक्कीच विचार करायला हवा आणि अशा निर्णयांना विरोध करायला हवा.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९१२२५४६२९५

# नवीन संसद भवनात लोकप्रतिनिधींकडून शिस्तीची अपेक्षा

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २८ मे रोजी नवीन संसद भवनाचे दिमाखदार सोहळ्यात उदघाटन झाले. नवीन संसद भवन हे आत्मनिर्भर भारताचे प्रतीक असून अतिशय आकर्षक, भव्यदिव्य आणि अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असे हे नवे संसद भवन म्हणजे भारताच्या लोकशाहीचे प्रतीक आहे. संसद भवन म्हणजे लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे या पवित्र मंदिरात बसून लोकप्रतिनिधी आपल्या जनतेचे प्रश्न सोडवत असतात. नवीन कायदे बनवत असतात. देशाच्या उज्वल भविष्याचे निर्णय याच लोकशाहीच्या पवित्र मंदिरात घेतले जातात. संसद भवन म्हणजे १४० कोटी देशवासियांच्या आकांक्षा आणि स्वप्नांचे प्रतिबिंब आहे.**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात देशाला लोकशाहीचे प्रतीक असलेले नवीन संसद भवन मिळाले याचा देशवासियांना सार्थ अभिमान आहे. यावर्षीच्या पावसाळी अधिवेशनपासूनच या संसद भवनात कामकाज सुरू होईल. आता याच नवीन संसद भवनात बसून लोकप्रतिनिधी जनतेचे प्रश्न मांडतील, जनतेचे प्रश्न सोडवतील ही अपेक्षा आहे मात्र हे करत असताना लोकप्रतिनिधींकडून जनतेच्या काही अपेक्षा आहेत. नवीन संसद भवनात जनतेची लोकप्रतिनिधींकडून सर्वात मोठी अपेक्षा आहे ती म्हणजे शिस्तीची. आपल्या लोकशाहीला खूप मोठी परंपरा आहे. पंडित नेहरूंपासून अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळापर्यंत ही परंपरा पाळली गेली. सत्ताधारी पक्ष असो की विरोधी पक्ष सर्वांनी आपल्या वर्तुणुकीतून एक आदर्श निर्माण केला. त्यांनी आपल्या वर्तुणुकीतून लोकशाहीचा सन्मानच वाढवला मात्र आजच्या लोकप्रतिनिधींना आपल्या या महान परंपरेचा विसर पडला असल्याचे दिसून येते. अलीकडे संसद भवनातील लोकप्रतिनिधींची वर्तणूक लोकशाहीला साजेशी नसते. याला कोणत्याही बाजूचे लोकप्रतिनिधी अपवाद नाहीत वास्तविक शिस्त आणि उत्तर व्यवहार ही संसदीय व्यवस्थेची ओळख आहे मात्र अलीकडे ही ओळख पुसली जाऊ लागली आहे. शिस्त नावाचा प्रकारच संसद भवनात पाहायला मिळत नाही. संसदेत होणारी चर्चा आणि मांडले जाणारे विषय उच्च दर्जाचे असतात त्यामुळे त्या विषयावरील चर्चेत लोकप्रतिनिधींनी सहभागी व्हायला हवे सुदृढ चर्चा आणि सहमतीनेच संसदेत विधेयक मंजूर केले जातात मात्र अलीकडे चर्चा सहमतीने कोणतेच विधेयक मंजूर होत नाही. गोंधळा शिवाय विधेयक मंजूर झाले असे अभावानेच घडते. गोंधळात अनेकदा असंसदीय भाषा वापरली जाते. लोकप्रतिनिधींकडून असंसदीय भाषेचा वापर जनतेला अपेक्षित नाही. लोकप्रतिनिधींनी असंसदीय भाषेचा वापर केल्यास तसेच संसदेत बेशिस्त वर्तन केल्यास लोकांच्या भावना दुखावतात. लोकप्रतिनिधींनी लोकशाही मूल्यांचे पालन करण्याची अपेक्षा आहे. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणे हे लोकप्रतिनिधी आणि लोकशाही संस्थांसमोर सर्वात मोठे आव्हान आहे. लोकप्रतिनिधींनी संसदीय नियमांचे पालन करावे. सभागृहातील चर्चेवेळी अनावश्यक कडवटपणा निर्माण होणार नाही याची काळजी दोन्ही बाजूंच्या लोकप्रतिनिधींनी घ्यावी. संसदीय लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षासोबत विरोधकांचीही महत्वपूर्ण भूमिका असते त्यामुळे सामंजस्य, सहकार्य आणि अर्थपूर्ण विचारांची देवाणघेवाण व्हावी. सत्ताधाऱ्यांनीही विरोधकांच्या मताचा आदर करावा. जर शिस्त राखून सर्वांनी एकदिलाने काम केले तरच लोकशाहीचे आणि संसदेचे पावित्र्य राखले जाईल.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जिंतूर मतदारसंघातील कामास भरघोस निधी उपलब्ध करून दिला

## आमदार मेघना साकोरे बोर्डीकर

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** मतदारसंघातील रस्त्यांची अत्यंत दुरावस्था लक्षात घेता आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी खालील दर्शविलेली विविध विकास कामे अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च 2023 मध्ये मंजूर करून निधी उपलब्ध करून दिला आणि आज रोजी तब्बल च्या 43 कोटी रुपयांची विविध विकास कामांचे उद्घाटन त्यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी त्यांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकार संयुक्त सरकार मार्फत गोरगरीब जनतेला ज्याही योजना राबविल्या जात आहेत त्यांचा आढावा त्यांनी यावेळी आवर्जून घेतला आहे यात प्रामुख्याने श्रावण बाळ, वृद्धापकाळ,विधवा परीतक्ता,अपंग आणि घरकुल योजने संदर्भात देखील त्यांनी आढावा घेतला याप्रसंगी मतदार संघातील सर्वसामान्य जनतेने जो माझ्यावर विश्वास टाकून मला निवडून दिले त्या विश्वासास कदापी तडा जाऊ न देता मतदार संघातील सर्व काम तत्पर होतील असा विश्वास या निमित्ताने सर्वांना दिला. 1 ) राममा ७५२ ते मोळा-नव्हाती तांडा - वाघी-धानोरा-हंडी या रस्त्याच्या कामासाठी १५ कोटी रुपये 2 ) रा.मा.२४८ ते शेवडी-भोसी-पिंपळगाव-कुऱ्हाडी-दहेगाव-वझर रस्ता प्र.जि.मा. ४ किमी च्या २० कोटी रुपये 3 ) राममा-७५२ चारठाणा पाटी-कु-ऱ्हाडी-करंजी-बामणी-रस्त्याच्या कामासाठीत ८ कोटी रुपये. यावेळी तालुकाध्यक्ष लक्ष्मण बुधवंत, भगवान वटाणे,सुनील भोंबे, सुनील मते,कैलास खंदारे,रमेश ढवळे,रवी रणबावळे,विलासआण्णा गिते,विठ्ठल काका भगस,नारायण काचगुंडे,इंद्रजीत घाटुळ,अनिरुद्ध चव्हाण,रामभाऊ जाधव,केशव घुले,वाल्मीकी टाकरस,सुधाकर घुगे,बबन पाटील,दामु घुगे,प्रकाश पवार,डिगांबर ठोंबरे,रोहीदास राठोड,कऱ्हाळे गुरजी,बाबासाहेब काजळे,दत्ता काजळे,माऊली ढोणे,भगवान ठोंबरे,तुकाराम काजळे,संजय पवार,भगवान ठोंबरे, शिरसाट, शाखा अभियंता दीपक कुपटेकर, विनोद देशमुख उपस्थीत होते.






# केंद्रीय पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी फिरोज शेख

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** केंद्रीय पत्रकार संघ व किया न्युज यांच्या सयुक्तविध्यामाने शिर्डी येथे भव्य पत्रकार संमेलन2023चे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाला प्रमुख उपस्थिती म्हणून केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले केंद्रीय पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप कसालकर, काय न्युजचे संपादक गुप्ता जी,Z24 तास चे मा. वृत्त निवेदक तथा मुख्य भाजपा चे सह प्रवक्ते अजित चव्हाण, गौरव शेट्टी,व्यास जी, आदी उपस्थित होते मागील आनेक वर्षांपासून औरंगाबाद जिल्ह्यातील व ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या हिररीने सोडविणारे व केंद्रीय पत्रकार संघाचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष तथा युद्ध भूमी चे संपादक फिरोज शेख यांच्या कार्याची दखल घेऊन केंद्रीय पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप कसालकर व राष्ट्रीय उपाध्यक्ष कमलेश गायकवाड यांनी केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते नियुक्ती पत्र व सन्मान चिन्ह देऊन संपादक फिरोज शेख यांची महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली या वेळी त्यांना केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले केंद्रीय पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपाध्यक्ष कमलेश गायकवाड यांनी फिरोज शेख यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या भव्य पत्रकार संमेलन 2023 हे साईबाबांच्या नगरीत पार पडले संमेलनात सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी आपल्या खास शैलीमध्ये मनोगत व्यक्त केले. यावेळी पुणे, सोलापूर, अहमदनगर, पालघर,पनवेल, औरंगाबाद या ठिकाणाहून बरेच पत्रकार बंधू हजर होते. यावेळी क्या न्यूज ऍप चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# पिंपळे सौदागर येथे सावरकर जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महान क्रांतिकारक वीर सावरकर यांचे योगदान निश्चितच अतुलनीय आहे, त्यांच्या विचारांची जोपासना करुन समाजाला संघटित करण्याचे काम नेटाने पुढे चालविले पाहिजे असे प्रतिपादन विलास जोशी यांनी केले. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४० वी जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. येथील पिंपळे सौदागर परिसरातील राजवीर पॅलेस मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. प्रारंभी विठ्ठल देवगावकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थित काही ज्येष्ठ नागरिकांनी सावरकरांचे विचार, त्यांचे कार्य आणि आजची सामाजिक परिस्थिती या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले. तृप्ती जोशी आणि आदिती जोशी यांनी " जयोस्तुते जयोस्तुते श्री महनमंगले " हे गीत सादर करुन सावरकरांना अभिवादन केले. या कार्यक्रमास विठ्ठल देवगावकर, विजय देवगावकर, शशिकांत कुलकर्णी, श्रीनिवास पारखी, अनिल कुलकर्णी, जयवंत चौधरी, शंतनु जोशी, अभिजित जोशी, राजन धोंगडे, दिनेश कुलकर्णी, विवेकानंद थत्ते, राजेंद्र देशमुख, वासंती जोशी, संगीता देवगावकर, मनीषा सरवटे, व्रुषाली चांदोरकर, लक्ष्मी पारखी, भावना बुजोणे, आरती चिनगी, विजया तारे, स्नेहा चिंचवडकर आदि उपस्थित होते. चहापान आणि अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.






अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ, संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta












# लोटांगण कोणासमोर आणि कशासाठी...?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी


**भारतात लोकशाही व संविधान धोक्यात असल्याचे अनेक अनुभव भारतीय जनतेला आलेले आहेत. लोकशाही मध्ये लहानातीव लहान घटाकांचा विकास होण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न व नियोजन करणे आवश्यक असते. लोकशाही मध्ये कोणत्याही प्रकारचा भेद न करता सामाजिक समस्या लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना करून लोकांचे राहणीमान उंचावून त्यांना प्रवाहामध्ये आणण्याचे काम करावे लागते. भारतात अनेक धर्म,जाती व वेगवेगळ्या सामाजिक विविधतेचे लोक राहतात. भारतीय नागरिक म्हणून प्रत्येकाला समान हक्क अधिकार बहाल करून विकासाची समान संध निर्माण करून दिली आहे. जाती धर्मांच्या व वर्ण व्यवस्थेच्या आधारावर दुर्लक्षित केलेल्या लोकसमुहाला हक्क अधिकार ही सारखेच आहेत.**

परंतु विकासाच्या प्रवाहात आणताना त्यांना प्राधान्य क्रम देण्यात आला. अनेक धर्म, जाती, खाणपान, रहनसहन प्रत्येक बाबतीत विविधता असलेल्या देशात जनता सुखी समाधानाने आनंदी जिवन जगत होती. याचे एकमेव कारण भारतीय संविधान. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला सारखे हक्क अधिकार, सारखेच महत्त्व देऊन धर्म हि वैयक्तिक बाब आहे व प्रत्येकाला आपापल्या धर्माचे आचरण करण्याचा व उपासना करण्याचा अधिकार बहाल केला. कोणी कोणताही धर्माचा असो त्याला त्याच्या वैयक्तिक जिवनामध्ये धर्माचे पालन करण्याचा अधिकार असला तरी सार्वजनिक ठिकाणी कोणताही धर्माला कोणतेही महत्व न देता भारतीय म्हणून जगण्याचा अधिकार संविधानाने दिला. कायद्यासमोर व सरकार समोर कोणताही धर्म मोठा किंवा कोणताही धर्म लहान नाही. सरकार व कायद्याने प्रत्येक व्यक्ती कडे भारतीय म्हणून बघणे आवश्यक आहे. देशात शांतता, सुव्यवस्था अबाधित कशी राहिल याचे सर्व मार्ग संविधानायध्ये दिलेले आहेत. कोणाला काहीच परिश्रम घेण्याची वा नवीन काही करण्याची गरज नाही फक्त गरज आहे संविधानाची अंमलबजावणी इमानदारीने करण्याची. परंतु मागिल काही वर्षा पासून संविधानाची पायमल्ली उघड पणे होत आहे. प्रत्येक ठिकाणी धर्माला समोर करून लोकांना भावनिक बनवून धर्माच्या आडून मताचे राजकारण करण्यासाठी माणसामाणसात द्वेष व रोष पसरवण्याचे काम सरकार करत आहे. हिंदुत्वाच्या नावाखाली रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा काढून घेतल्या, कराच्या स्वरूपात जनतेची लुट केली आणि महागाईच्या स्वरुपात जनतेचे जिवन असह्य केले. या बाबीवर पडदा पडावा म्हणून सरकार पुरस्कृत इलेक्ट्रॉनिक मिडिया ने रात्रंदिवस हिंदु धोक्यात असल्याच्या भावनिक गोष्टी पसरवून लोकांच्या मनात हिंदु धोक्यात असल्याची भीती पसरवून दिली. लोकांना वाटतं खरचं हिंदु धोक्यात आहे सरकार हिंदुच्या रक्षणासाठी काम करत आहे मग बाकीच्या गोष्टी जाऊ द्या धर्म वाचला पाहिजे. परंतु लोकांच्या डोक्यात कधीच प्रश्न आला नाही संख्येने हिंदु जास्त, हिंदुचे आमदार खासदार, नोकरदार, जमीनदार जास्त, दैवशक्ती असलेले स्वयंघोषीत बुआ जास्त संख्येने असताना धर्माला धोका निर्माण होऊच कसा शकतो ? याचा अर्थ हिंदु समाज हा कमकुवत व शक्तीहीन आहे. असाच अर्थ निघतो. हिंदु लोकांना धोका आहे तरी कोणा पासून ? गांधीची हत्या करणारे, पानसरे, दाभोळकर, गौरी लंकेश, कलबुर्गी यांची हत्या करणारे, भारताची गुप्त माहिती पाकिस्तानला देणारे कुरूलकर, पाठक, बॉम्बस्फोटाचे आरोप असून जेलमध्ये गेलेल्या प्रज्ञासिंग ठाकूर यांच्या पासून खरचं देशाला धोका आहे परंतु सरकार यावर काहीच बोलत नाही. मग धोका आहे कोणाकडून ? सरकारच्या नाकर्तेपणा ला कंटाळून धर्मापाटील विधान भवनावर आत्महत्या करतात ही बाब जनता विसरली का ? पंजाब च्या शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करून शेतकऱ्यांची हत्या करणारे, शेतकऱ्यांना नलक्षवादी समजणारे, नैसर्गिक कडाक्याची थंडी असताना शेतकऱ्यांवर थंड पाणी फवारून शेतकरी आंदोलन दाबणारे, शेतकऱ्यांच्या विरोधात कृषी कायदे लागु करणाऱ्या पासून अर्थाने देशाला व हिंदू ना धोका आहे. पण याची जाणीव सरकारचा मिडिया लोकांना होऊच देत नाही. मिडीयाने धार्मिक तेढ निर्माण करू नये असे सर्वोच्च न्यायालयाने सुचना दिलेल्या असताना सरकार सर्वोच्च न्यायालयाला न मानता आपले काम करत आहे येथेच देशाला व लोकशाहीला धोका आहे. देशामध्ये शाळा, हॉस्पिटल बांधण्याची गरज असताना जनतेचा पैसा खर्च करून सरकारने संसद भवन बांधले. भारतीय संविधानानुसार संसदेवर कोणत्याही धर्माचा, पक्षाचा वा जातीचा कोणताही अधिकार नाही. देशच धर्मनिरपेक्ष आहे तर संसदही धर्मनिरपेक्ष व पक्षनिरपेक्ष आहे. संसदेमध्ये पक्षाचे व धर्माचे नाही तर जनतेचे प्रश्न सोडवले जातात म्हणून संसदेवर



प्रत्येक भारतीय नागरिकांचा अधिकार आहे. म्हणून संसद भवनात फक्त जनतेच्या उद्धाराचे नियोजन होऊन त्यावर अंमलबजावणी करावी लागते. आपला धर्म, आपला पक्ष संसदेच्या बाहेर सोडून द्यावा लागतो. लोकप्रतिनिधी हे धर्माचे वा जातीचे प्रतिनिधी नसतात ते सर्वधर्मीय जनतेचे प्रतिनिधी असतात. म्हणून एकाच जातीवर व धर्मावर गर्व करून धर्माचे चुकिच्या पद्धतीने पालन करणे म्हणजे संविधानाचा अवमान आहे. देशाचा प्रथम नागरिक हा राष्ट्रपती असतो. राष्ट्रपती देशाचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठी जनतेच्या प्रतिनिधी मधुन एकाची प्रधानमंत्री म्हणून नेमणूक करतात व प्रधानमंत्री यांच्या साहाय्याने मंत्रीमंडळ निर्माण करतात. प्रधानमंत्री व मंत्रीमंडळ यांना कोणताही पक्ष, धर्म वा जात नसते त्यांना देशातील प्रत्येक नागरिकांच्या हितासाठी काम करावे लागते. असे असताना ही प्रधानमंत्री देशाचे असताना, राष्ट्रपती यांना डावलून प्रधानमंत्री यांनी एकाच धर्माच्या धर्म पंडिताना बोलावले तेव्हा लक्षात आले प्रधानमंत्री हे देशाचे नाही तर धर्माचे आहेत. आणि प्रधानमंत्री मंत्री यांचे मनही अगदी लहान आहे. जनतेने व १९ विरोधी पक्षांनी उद्घाटनला विरोध केल्यानंतर मोठ्या मनाने प्रधानमंत्री यांनी राष्ट्रपती यांच्या कडून उद्घाटन करून घेऊन मनाचा उदारपणा दाखवावा लागत होता. संसदेचे धार्मिक पद्धतीने उद्घाटन करायचे होतेच तर सर्व धर्माच्या धर्मगुरूंना निमंत्रीत करून संसद सर्व धर्मायांची आहे आहे हे सिद्ध करून मनाचा मोठेपणा दाखवून देण्याची संधी प्रधानमंत्री यांनी गमावली. थोडक्यात प्रधानमंत्री हे देशाचे नाहीत तर धर्माचे आहेत प्रधानमंत्री यांचा धर्म विषमतेवर आधारित असल्याचे दिसते. एकाच धर्माच्या पद्धतीने पुजा करून प्रधानमंत्री चक्क लोटांगण घेतात हे लोटांगण नेमके कोणासमोर आणि कशासाठी हा प्रश्न उरतो. नरेंद्र मोदी या वैयक्तिक नावाने त्यांनी काहिही केले तरी कोणालाच काहीच फरक पडत नाही. परंतु प्रधानमंत्री म्हणून जर प्रधानमंत्री लोटांगण घेत असतील तर हा देशाचा अवमान आहे. देशाच्या प्रधानमंत्री यांनी लोटांगण घेऊन नेमका काय संदेश दिला. कोणाच्याही सन्मानात कमरेपासुन वंदन करणे हि संस्कृती आहे परंतु पुर्ण पणे झोपुन हात जोडण्याचा काय अर्थ आहे ? पुर्ण उलटे झोपुन माणुस तेव्हाच हात जोडतो जेव्हा तो हतबल झालेला असतो. त्याला काय करावे काहीच कळत नाही. देशातील जनता तर हतबल नाही मग प्रधानमंत्री यांनी असे का केले असेल ? प्रधानमंत्री लोटांगण नेमके कोणासमोर घेतले ? एकाच धर्माच्या धर्मगुरू समोर घेतले की राजदंडासमोर घेतले ? देश एकाच धर्माला मानत नाही किंवा प्राधान्य देत नाही व राहीला विषय राजदंडाचा तर राजदंड हा राजेशाही मध्ये असतो. लोकशाही मध्ये अशोकस्तंभाचा स्विकार आमच्या घटनाकारांनी केला आहे. प्रधानमंत्री पुन्हा राजदंड समोर करून स्वतः ला राजा व हुकुमशाहा समजत आहेत का ? कालच्या एकंदरीत परिस्थिती वरून प्रधानमंत्री यांना आपले अपयश लक्षात आलेले आहे. सत्ता हातून निघून जाईल अशी भिती वाटत आहे. म्हणून संसदभवन उद्घाटन सोहळ्यामधुन हिंदुत्व वादी लोकांना खुश करून इतर धर्मीय लोक बघा कसा विरोध करतात, म्हणून हिंदू धर्म धोक्यात आहे. आणि हे थांबण्यासाठी पुन्हा मलाच मत द्या म्हणजे मी धर्माचे रक्षण करेल हेच सांगण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु जनता हुशार व जागृत झाली आहे याचा फारसा परिणाम निवडणुकीवर पडणार नाही. तिकडे महिला खेळाडू एका महिन्यापासून लैंगिक आत्याचारा विरोधात सरकार ला न्याय मागण्यासाठी विनवण्या करत आहेत. आणि इकडे प्रधानमंत्री लोटांगण घेऊन बलात्काराचे आरोप असलेल्या खासदारांला वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहे. हा ढोंगी पणा लोकांच्या लक्षात आला आहे. म्हणून लोटांगण घेऊन प्रधानमंत्री लोकांचे समर्थन मिळवू शकत नाहीत किंवा देशाचे प्रधानमंत्री मंत्री म्हणून लोटांगण घेतले तरी जनतेला ते हतबल किंवा कमकुवत करू शकत नाही. परंतु स्वतः चे अपयश लपवण्यासाठी घेतलेले लोटांगण व मताचे राजकारण करण्यासाठी धर्माच्या नावावर केलेला अतिरेक मात्र इतिहास विसरणार नाही.

# एकनाथ आव्हाड यांच्या बालकविता



डॉ. किशोर सानप

आधुनिक केसरी

**बालपणापासूनच एकनाथांच्या बालमनावर साने गुरुजींच्या शामच्या आईचा पगडा आहे. गुरुजींचे विचार आणि संस्कारांनी त्यांचं व्यक्तिमत्त्व गुरुजीमय झालेलं दिसतं. पुढे उमेदीतच लहान मुलांचे कवी एकनाथ गुरुजीही बनले. एकनाथ, गेल्या पंचवीस वर्षांपासून मुंबई महापालिकेच्या शाळेत शिक्षक म्हणून अध्यापनाचे, मूल्यशिक्षणाचे संस्कार बालमनावर करणारे हसमुख, विनयशील, नम्र, निगर्वी, ध्येयनिष्ठ, साने गुरूजींच्या परंपरेतले सेवाभावी समर्पित गुरुजी आणि बालसाहित्यिक - बालकवी आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून एकनाथ आव्हाड बालसाहित्याच्या संस्कारशील भूमीची नैतिकतेने, निष्ठापूर्वक, साने गुरुजींच्या साहित्य परंपरेतच बालसाहित्याचे लेखन करीत आहेत.**

साने गुरुजींच्या विचारांची, नैतिकतेची, समाजनिष्ठेची, संस्कारशीलतेची छाप त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे भूषणही आहे. श्यामचं हृदय असलेला हा बाल लेखक आहे. बालकवी आहे. गुरुजींच्या मातृहृदयाचा वत्सल वारसा या कवीला लाभलेला आहे. एकनाथ आव्हाड म्हणजे साने गुरूजी कथामालेचे कृतिशील असे कार्यकर्तृत्व सिद्ध करणारे व्यक्तिमत्त्व आहे. सतत प्रयोगशीलपणे मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपडणारा सामाजिक कार्यकर्ता, मुलांचा पालक आहे. सिद्धहस्त लेखक, बालसाहित्यक, पाडगावकरांच्या भाषेत बालकवी आहे. बालकांवर संस्कार करणारी शैली आणि बालरंजक कथनतंत्र त्यांनी विकसित केले आहे. कथाकथनाचे तंत्र आणि मंत्र त्यांनी कार्यशाळेच्या माध्यमांतून विविध भागातील शिक्षकांनाही मार्गदर्शन करून, अवगत करून दिले आहे. अनेक साहित्य संमेलनांतून आणि कविसंमेलनांतून त्यांनी कविता गायन व कथाकथनाचे सादरीकरण केलेले आहे. कवी एकनाथ आव्हाडाचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व एकनाथ आव्हाडांचे बालवाङ्मयीन व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. बालकोश खंड १ ते ५ मध्ये त्यांच्या बालकविता, बालकथांचा समावेश आहे. आकाशवाणी, दूरदर्शनवरही त्यांच्या काव्यगायनाचे, कथाकथनाचे अनेक कार्यक्रम आजवर सादर झालेले आहेत. अभ्यासक्रमातही एकनाथ आव्हाडांच्या बालकविता, बालकथांचा समावेश झालेला आहे. सात पुस्तकांची ब्रेल लिपी आवृत्तीही प्रकाशित झाली आहे. पाठ्यपुस्तकांचे लेखन, संपादन, सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या शाळांनी मिळून आयोजित केलेल्या पहिल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद तसेच जळगावच्या दत्तुभाऊ जैन प्रायोजित १२ व्या बाल साहित्य संमेलनाच्या समारोप सत्राचेही अध्यक्षपद एकनाथांनी भूषवले आहे. आजवर त्याच्या बालसाहित्य व इतरही साहित्यकृतींना जवळपास शासकीय व मान्यवर साहित्यिक, सामाजिक प्रतिष्ठित संस्थांचे एकूण ४० च्या वर राज्यस्तरीय राष्ट्रीय पुरस्कारानेही एकनाथांचा गौरव करण्यात आला आहे. एकनाथ आव्हाडांची बालसाहित्य ग्रंथसंपदाही गुणवत्तेने अनमोल आणि संख्येने बहुआयामी आहे. सन् २००६ ते २०१७ पर्यंत एकूण ७ बालकविता, बालकथाकाव्य, जोडाक्षरविरहित संग्रह, १ काव्यकोडी संग्रह, ६ बालकथा संग्रह, १ प्रौढ काव्यसंग्रह - नव्याने बहरावे अशी विपुल ग्रंथसंपदा त्यांची प्रकाशित झालेली आणि प्रसिद्धही आहे. बालकविता संग्रह - बोधाई ( २००६ ), गंमतगाणी ( २००८ ), अक्षरांची फुले ( २००९ ), हसरे घर ( २०१० ), मज्जाच मज्जा ( २०११ ), तळ्यातला खेळ ( २०१३ ), पंख पाखरांचे ( २०१४ ), खरंच सांगतो दोस्तांनो ( कुमार काव्यसंग्रह ), आभाळाचा फळा ( बालकाव्यसंग्रह २०१६ ); काव्यकोडी संग्रह- मजेदार कोडी ( २०१५ ); बालकथा संग्रह-निष्फळ भांडण ( २०१० ), राजा झाला जंगलाचा ( २०१० ), थेंबे थेंबे तळे साचे ( २०१३ ), जरा ऐकूण तर घ्या ( २०१३ ), आनंदाची बाग ( २०१५ ), एकदा काय झालं ( २०१६ ); बालनाट्यछटा- मला उंच उडू दे! ( २०१७ ). एकूण सतरा बालसाहित्याचे ग्रंथ आजवर प्रसिद्ध झाले आहेत. सर्व बालसाहित्याचे ग्रंथ प्रतिष्ठित मान्यवर प्रकाशन संस्थांनी प्रकाशित केलेले आहेत. एकनाथ आव्हाडांची ही सर्वच ग्रंथसंपदा म्हणजे बालसाहित्याचा अमूल्य ठेवा आणि मेवाही आहे. एकनाथ आव्हाडांना मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीच्या क्षेत्रांत पर्यायाने बालसाहित्य संस्कृतीत एक अग्रगण्य आघाडीचा तरुणतुर्क, उमदा बालसाहित्यकार - बालकवी बालकथाकार म्हणून ओळखले जाते.... एकनाथ आव्हाडांच्या बालकवितेचे वेगळेपण कवी एकनाथ आव्हाडांचा मूळ पिंड कथाकथनकाराचा कथेमध्ये काव्य व काव्यात कथा, असा साहित्यिक प्रवास करताना, आव्हाडांचे अस्तित्व विशेषत्वाने जाणवते. अत्यंत साधी सोपी लयबद्ध शब्दरचना, कथनातील प्रवाहीपणा वाचकांची उत्सुकता वाढवते. पारंपरिक कथांना आधुनिकतेचा साज चढवून, काव्यात गुंफताना प्रत्येक कवितेचा शेवट बोधात्मक झाला पाहिजे, हा कवीचा आग्रह असतो. सामाजिक विषमता, सबलता दुर्बलता, अडाणीपणा, गर्विष्ठपणा, अतिलोभ, स्वार्थ या स्वभावधर्माचे परिणाम वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर कसे होतात ? याचेही दृष्टांत त्यांच्या कथा-कवितेतून विशेषत्वाने जाणवतात. बालकथा - बालकविता ह्या बालमनांवर सुसंस्कार करण्यासाठी आहेत, हे लक्षात घेऊन, त्यांना घटनाप्रधान करून, त्या घटनाही द्रुतगतीने पुढे पुढे सरकतील; याकडेही आव्हाडांनी विशेष लक्ष पुरवले आहे. बालकथा असोत की बालकविता असो, त्या लांबीच्या दृष्टीने मोठ्या नसाव्यात, त्यात गुंतागुंत नसावी, हेही सूत्र आव्हाडांनी बालकविता लेखनाच्या बाबतीत काटेकोरपणे पाळले आहे. आव्हाडांची सृष्टीच्या परिसरातील मानव आणि मानवेतर पात्रेही बालमनाशी सुसंवादी असतात. भाषेचाही जाणीवपूर्वक वापर करतात. आव्हाडांजवळ शब्दसामर्थ्य आणि शब्दभांडार खूप मोठे आहे. बोलीभाषेचाही गोड, सुमधूर स्पर्श त्यांच्या भाषेच्या वापरातून जाणवतो. आव्हाडांची भाषा प्रभावी आणि परिणामकारक आहे. त्यांच्या भाषेत ताल, नाद, लय, यमकसदृशता, गेयता असते. आबालवृद्धांच्या मनाचा ताबा घेण्याचे सामर्थ्य, त्यांच्या भाषेच्या वापरातून सतत जाणवते. नादमाधुर्य, गेयता, ताल, जोडाक्षरविरहितता, ताल-नादाचा प्रवास तर कविवर्य एकनाथ आव्हाडांच्या बालकाव्यसंग्रहांच्या नावांपासून तर अंतरंगातील रचनांपर्यंत सतत सुरूच असतो. उदाहरणार्थ, निसर्गाचं रूप दाखवणाऱ्या जोडाक्षरविरहित झाडाचे बोल या कवितेत झाडाचे बोल म्हणजे गोड फळ. त्यांच्या फुलांना सुगंध असतो. पानांनी असा ताल धरला आहे की जणू झाडानं पायात चाळ बांधलेले आहेत. झाडांची पानं, फुलं, फळं जणू लहान मुलांसोबत जमिनीवर उतरून, खेळत आहेत. अबोल सजीव सृष्टीला एकनाथ जगण्याची आणि जगवण्याची भाषा बहाल करतो. आबालवृद्धांना बालपणात रमवणारी, रिझवणारी, गुंगवून ठेवणारी कविता बालपणाच्या गतकालात वृद्धांनाही बाल संजीवनी बहाल करते. उदाहरणार्थ गंमत गाणी मधील खालील कविता बघा; झाडा रे झाडा डोल रे डोल, फळासारखे तुझे गोड गोड बोल झाडाला आली सुगंधी फुले, फुलांनी बांधले झाडावर झुले पानाने धरला तालावर ताल, झाडाने घातला पायात चाळ झाडाची फुले उतरली खाली, सुगंधी सारी जमीन झाली.... घमेंडी कपाट मध्ये- पुढून पाठ मागून सपाट, बाबांनी आणले गोदरेज कपाट कपाटाला खण आहेत खूप, खणात पैसे बसतात चूप; पैशांचे घमेंडी भारी, उघडायला गेलं की कुरकुर करी... कामधेनू मध्ये चारा खाई चुरू चुरू, रानात जाई तुरु तुरु, शिंगे तिची छोटी छोटी, शेपटी आहे लांब मोठी; तांबडा पांढरा तिचा रंग, वासराचे चाटी अंग; कामधेनू बोले सारे ही सांगा कोण बरे ?... अक्षरांची फुले मध्ये कवी म्हणतो, लहान मुले स्वप्नात तरंगतात. हिरवीगार सृष्टी त्यांचे स्वागत करीत असते. खळाळता झरा आणि अवखळ वाराही भेटण्यास, हितगूज करण्यास उत्सुक असतो. आकाशासारखे घरदार खुले असून, कुणाचाही मज्जाव नसतो. किशोरच किशोरांच्या राज्याचे अनभिषिक्त सम्राट असतात. किशोरावस्था ही आनंदाचे गाणे असते, हेच कविला सूचवायचे आहे. स्वप्नात माझ्या एक विमान आले, किशोरांच्या राज्यात घेऊन मला गेले. स्वागतास उभी येथे हिरवीगार झाडे, उंच उंच डोंगराचे राज्याभोवती कडे.... किशोरांच्या राज्यात नाही काही उणे, प्रत्येकाच्या ओठावरी आनंदाचे गाणे... मजेदार कोडी या कविता संग्रहातील कोडी गाऊन, नाचून, हसत हसत वाचकांना कोडी घालून, आबालवृद्धांचे मनोरंजन करून कवी एकनाथ बोधही देतात. विचार आणि बुद्धीलाही चालना देतात. कमीत कमी पाच ते जास्तीत जास्त नऊ अक्षरांच्या आणि आठ ओळींच्या या साऱ्याच रचना गेयता, ताल आणि नादमयतेमुळे आबालवृद्धांनाही नादवतात. नादी लावतात. उदाहरणार्थ, बळकट सुळे, मानेवर याच्या, आयाळ रुळे, रुबाबात फिरताना, दिसतो कसा पाहा, जंगलचा राजा, कोण बरे हा ?.... तसेच, तळ्यामध्ये फुलते, वाऱ्यावर डुलते, चिखलात राहून, प्रसन्न बोलते, राष्ट्रीय फुलाचा मिळे, त्याला मान, पाकळ्या फुलताच, कोण हसे छान ?... आव्हाडांची कोडी तिच्यातील लयबद्धतेमुळे आणि नादमाधुर्यामुळे बालमनांवर आणि प्रौढ मनांवरसुद्धा संस्कार करतात. मन प्रसन्न, प्रफुल्लित, उत्सुक, उत्स्फूर्त, आनंदितही करतात. खरंच सांगतो दोस्तांनो मध्ये आनंदाच्या गाठीभेटी मध्ये कवी म्हणतो, माझ्या मुला हास जरा, जगण्याचा तू श्वास खरा, दुःख जरी जरतारी, विसर त्यास क्षणभरी... असा आबालवृद्धांनाही दिलासा देतात. दुःखांवरही फुंकर घालून जगण्याचा आणि निसर्गासह जगवण्याचाही मूलमंत्र कवी एकनाथ कवितेतून मांडतात. एकनाथ आव्हाडांच्या बालगीतात, बालसाहित्यातच एवढे सजनशीलतेचे महाकाय सामर्थ्य आणि प्रातिभ आहे की, चिकित्सा करणाऱ्या आमच्यासारख्या समीक्षकांच्याही लेखणीतून, आपसूकच बालगीतसदृश प्रतिभेचे झरे धोंधों वाहू लागतात. कविवर्य एकनाथ आव्हाडांनी आपल्या बालकविता-बालकथांतून मुलांच्या मनाला भिडणारी, भावस्पर्शी वर्णने केलेली असून चित्रात्मक सदृश्यता निर्माण केली आहे. बालकांच्या मनःचक्षूंसमोर साक्षात अनुभव चित्ररूप उभा राहतो. तरल, भावपूर्ण, आनंदनिर्मितीच्या लहरी मनामनांत निर्माण करतो. बालवयात रंग व चित्रांची भाषा मुलांना आकर्षण आणि आकलनासाठी उपयोगी ठरते. कविता संग्रहातील चित्रे, रंगसंगती, लयबद्ध गेय भाषिक रूपे आदींमुळे आव्हाडांच्या बालकविता एकूणच मराठी बालसाहित्यात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करते. आबालवृद्धांसह सर्वच जीवमात्रांसाठी खरेतर ती आनंद गाणीच आहेत. कवी एकनाथांच्या बालकविताः आनंदरसाची निर्मिती बालसाहित्यकार कविवर्य, कथाकाव्यकार एकनाथ आव्हाड हे किमान आजच्या आधुनिक आणि ग्लोबल युगात लोकप्रिय आणि बालकप्रिय असे बालसाहित्यकार आहेत.**क्रमशः**

# चालकांनी वाहनावर नियंत्रण ठेवावे



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रासह देशात होणारे ८५ टक्के अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा चुकांमुळे होत असल्याचे दिसून येते,तर १५ टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतांना दिसतात.एवढे माहीत असूनही वाहन चालक आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते.यामुळे भयावह अपघात होतांना आपण पहातो.दिनांक २३ मे २०२३ ला संपूर्ण महाराष्ट्राला हादरा देणारी भयावह दुर्घटना घडली.या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला पुण्यावरून मेहकरकडे जाणाऱ्या एसटीच्या बसला कंटेनरने दिलेल्या धडकेने बस चक्काचूर झाली व दोन्ही वाहनांच्या चालकांसह ६ प्रवासी ठार तर २८ गंभीर जखमी झाले.**

दुसरी घटना अंजनगाव येथील लग्न सोहळ्यावरून दर्यापूरला परत येत असतांना मागुन येणाऱ्या ट्रकने टाटा एस या प्रवासी वाहणारा धडक दिल्याने एकाच कुटुंबातील ५ प्रवासी ठार तर ८ जण गंभीर जखमी झालेत.तीसरी घटना नागपूर -शिर्डी बस समृद्धी हायवेवर दुर्घटनाग्रस्त झाली.यात १ मृत्यू तर ८ घायल झाले. म्हणजे भयावह दुर्घटनांचा सिलसिला दररोज आपल्याला कुठे ना कुठे पहायला मिळतो ही अत्यंत दुःखद आणि गंभीर बाब आहे. या संपूर्ण घटना वाहन चालकांच्या चुकांमुळेच होत असल्याचे आतापर्यंतच्या घटनांवरून लक्षात येते.या तिन्ही अपघाती घटना अंगावर शहारे येणाऱ्या आहेत. देशातील अपघातांचा विचार केला तर प्रत्येक तासाला १८ लोकांचा अपघाती मृत्यू होत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.ज्याप्रमाणे वाहन चालकांसाठी रस्त्यांच्या सुविधा उपलब्ध झाल्यात त्याच गतीने अपघात मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.त्याचप्रमाणे राज्यात दिवसेंदिवस रस्ते अपघातामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा होत आहे. सरकारी आकड्यानुसार राज्यात दोन वर्षांच्या काळात विभिन्न क्षेत्रात ५९५९७ रस्ते अपघात झालेत. यामध्ये २७००० लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते.जानेवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत रस्ते अपघातात ४७७९३ लोक जखमी झालेत. ज्याप्रमाणे राज्यात किंवा देशात रस्त्यांच्या सुख-सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्याच गतीने अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.आपले पुर्वज म्हणायचे जेवण सुख तेवढंच दुःख त्याचीच पुनरावृत्ती होत आहे की काय असे वाटते.आज सुखाच्या भोवऱ्यात आपल्याला दुःखाचा कळस पहायला मिळतो.राज्याच्या जनतेच्या सुविधांच्या दृष्टीकोनातून ७०१ किलोमीटर लांबीचा नागपूर ते मुंबई हा नागपूर द्रूतगती मार्ग (समृध्दी महामार्ग) बनविण्यात आला.या मार्गाचे लोकार्पण ११ डिसेंबर २०२२ झाले.समृध्दी महामार्ग राज्याच्या दहा जिल्ह्यांतून जातो.त्याचप्रमाणे ३९० वेगवेगळ्या खेड्यांना वळसा देवुन जातो. परंतु वाहन चालक आपल्या वाहनाच्या गतीवरील नियंत्रणात न ठेवता वाहन चालवितांना निदर्शनास आले आहे.त्यामुळे आतापर्यंत समृध्दी महामार्गवर अनेक अपघात झाल्याचे आपण पहिले. ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. दर दोन दिवसांला एक अपघात अशी परिस्थिती समृध्दी महामार्गावरील असल्याचे दिसून येते.समृध्दी महामार्गावरील वेगमर्यादा १२० किलोमीटर प्रति तास अशी आहे.यामुळे थोडीशी चुक मोठे अपघाताचे कारण ठरू शकते व ठरत आहे.त्यामुळे समृध्दी महामार्गावरील वाढते अपघात पहाता प्रशासनाने आणखी कठोर पावले उचलायला हवी.वाढते अपघात पहाता प्रत्येक ४० किलोमीटर अंतरावर थांबे आवश्यक आहेत.कारण इंजिन गरम होणे,टायर गरम होणे यामुळे होणारे अपघात यावर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल व वाहन चालकांना विश्रांती मिळेल आणि अपघात टाळता येईल. त्याचप्रमाणे वाहन चालकांनी वाहन चालवीतांना डोळ्यात तेल टाकून वाहन चालवायला पाहिजे. कारण गेल्या काही दिवसांपासून समृद्धी महामार्गावर व राज्यातील इतरही मार्गावर रस्ते अपघातांची मालिका रोजची सुरूच आहे. त्यामुळे वाहन चालकांनी वाहनांवर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे इतर अपघातांचा विचार केला तर रोडचे खड्डे, रोडचे बांधकाम यामुळे सर्वसामान्यांना आवागमन करण्यास मोठी अडचण निर्माण होते. रोडचे काम सुरू असताना वनवे ट्राफीक असते अशाच ठिकाणी अपघाताचे प्रमाण सुध्दा जास्त दिसून येते. अशाप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढल्याचे आपण पहातो.कारण प्रत्येक व्यक्ती आपल्या कामानिमित्त किंवा नौकरीवर जात असतो.परंतु वाढते रोडचे अपघात पहाता प्रत्येकामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होने सहाजिकच आहे. यावरून स्पष्ट होते की घरून निघालेला व्यक्ती वापस घरी सुखरूप पोहचेलच याची काहीही हमी नसते ही बाब सध्याच्या होणाऱ्या वाढत्या अपघातावरून लक्षात येते. कोणताही अपघात असो यात एकालाच दोष देता येणार नाही. वाहन चालकांनी आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे असते.त्याचप्रमाणे घरून निघताना हेल्मेट घालुनच निघायला हवे.कारण कोणताही अपघात सांगुन येत नाही.त्यामुळे या धकाधकीच्या जीवनात स्वतःचा जीव स्वतःलाच सांभाळायचा हवा. वाहन चालवितांना दुचाकी असो अथवा चारचाकी असो आपल्या वाहणाच्या वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे



सरकारने व वाहतूक प्रशासनाने दुर्घनांच्या ठिकाणी जातीने लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे.रोडचे अपघात रोखण्यासाठी सरकार, प्रशासना व नागरिक यांच्यात समन्वय असायला हवा.त्याचप्रमाणे वाहतुकीच्या बाबतीत सरकारने किंवा वाहतूक प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे संपूर्ण नागरिकांचे प्रथम कर्तव्य बनते. कारण "जान है तो जहान है" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.परंतु राज्यातील अनेक भागात टिप्पर,ट्रक चालकांच्या व इतर वाहनचालक यांच्या निष्काळजीपणामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.याचीच पुनरावृत्ती आपण बुलढाणा, अमरावती या भयावह अपघातामध्ये पहाली.यावर वाहतूक प्रशासनाने कठोर पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे. राज्यात व देशात अपघातांची वाढती संख्या अत्यंत चिंताजनक व धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येते.याकरिता आपण सर्वांनी सर्वप्रथम वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. वाहन चालकांनी लांब प्रवास करतांना आपल्या वाहनांची हवा वेळोवेळी तपासली पाहिजे.त्याच प्रमाणे समृध्दी महामार्गावरील वाढते अपघात हे वेगवान गाडीच्या गतीमुळे टायर गरम होतात यामुळे सुध्दा अपघात होत असल्याचे सांगितले जाते.याकरिता वाहनांची हवा वेळोवेळी तपासने व थोडी-थोडी वाहनांला विश्रांती देणे गरजेचे आहे.यामुळे अपघातावर आळा बसु शकतो. वाहन चालवितांना मुख्यत्वे करून मोबाईलचा वापर करूच नये,मद्य प्राशन करून ड्रायव्हिंग करू नये, सिग्नलला वाहन जंप करू नये, कुठेही जातांना वेळेच्या आधी निघावे जेनेकरून वाहन चालवीतांना घाई-गडबड होणार नाही, मागेपुढे चालत असलेल्या वाहनांना ओव्हर टेक करू नये,आपल्या वाहनांचे हॉर्न, ब्रेक,इंडीगेटर सदैव व्यवस्थीत (ओके) असायला हवे व वेळप्रसंगी अप्पर-डीप्परचा वापर सुध्दा करावा.या संपूर्ण महत्वपूर्ण बाबींचा योग्यवेळे वापर व्हायलाच हवा जेनेकरून अपघात रोखण्यास मोठी मदत होईल. त्याचप्रमाणे वाहन चालवितांना नेहमीच सतर्कता बाळगली पाहिजे. वाढते अपघात पहाता प्रशासनाने योग्य पाऊल उचलावेत व वाढते अपघात टाळण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करावे यात नागरिकांनी प्रशासनाला सर्वोतोपरी मदत करावी.

# आदर्श संसार पण कष्ट अपार!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं.**

डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता. माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर



बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वतःच्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे निर्वाण झाले.

!! माता रमाई व त्यांच्या अपूर्व त्यागाला त्रिवार अभिवादन !!

# तंबाखू सोडा

आधुनिक केसरी

तंबाखू हे एक वाईट व्यसन आहे. आज जगात अनेक ठिकाणी तंबाखू व त्यापासून बनविण्यात येणारे पदार्थ अनेक जण खातात. व हळू हळू त्याच्या आहारी जातात. तंबाखू मध्ये निकोटीन नावाचे द्रव्य असते ते आरोग्याला मारक असते . एका अंदाजानुसार जगात दरवर्षी १० लाखावर लोक तंबाखू व त्याच्या पदार्थ खाण्यामुळे मृत्यू मुखी पडतात. तसेच धूम्रपान करतात. जगातील ३६ टक्के पुरुष व ५ टक्के महिला तंबाखू किंवा त्याचे पदार्थ खातात पूर्वी हे व्यसन



स्त्रियांच्यात क्वचित दिसे. आज मात्र अगदी महाविद्यालयीन तरुणी सुद्धा धम्रपान करताना दिसतात. तंबाखू पासून सिगरेट बनविल्या जातात. अखंड सिगारेट ओढणारे चेन स्मोकर आज अनेक ठिकाणी आपणास दिसतात या व्यसनामुळे हृदय रोग, कर्करोग, टीबी, फुफ्फुस रोग, यकृताचे विकार, इत्यादी होतात. व्यंग असणारे बाळ सुद्धा हे व्यसन असणाऱ्या महिलेकडून जन्माला येण्याचा धोका असतो. आज अनेक शालेय मुलांना तंबाखूचे व्यसन लागलेले असते. अनेक जण मजेखातर सिगारेट ओढतात व व्यसनाच्या आहारी जातात. सिगारेट ओढणाऱ्या मध्ये पुरुषांच्या बरोबर स्त्रियाही आहेत सिगारेट ओढणाराच्या जवळ बसले कि सिगारेटचा उग्र वास येतो. या तंबाखू व्या व्यसनाला रोखण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न सुरु झाले. जागतिक आरोग्य संघटनेने ७ एप्रिल १९८८ ह्या दिवशी ठराव केला व ३१ मे १९८८ पासून हा दिवस जागतिक पातळीवर तंबाखू विरोधी दिन म्हणून साजरा करण्यास सुरवात झाली. दरवर्षी एक घोषवाक्य या विरोधी दिनाच्या निमित्ताने तयार केले जाते. २०२३ साठी " आम्हाला अन्न हवे ... तंबाखू नको ' हे वाक्य यासाठी निवडण्यात आले आहे. या दिनानिमित्त सार्वजनिक ठिकाणी जाहिरात मोहिमा, व तंबाखूचे धोके लोकांना पटवून दिले जातात . विविध राज्य सरकारे व केंद्र सरकारच्या सहयोगामुळे अनेक कायदे केलेले आहेत . सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व ध्रुमपानास बंदी , शालेय परिसरात १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीस बंदी १८ वर्षाखालील मुलांना तंबाखू विक्रीस बंदी असे अनेक कायदे केले आहेत . असे जरी कायदे केले असले तरीही आजसुद्धा अनेक जण या व्यसनाच्या आहारी गेले आहेत . ही दुर्दैवाची घटना आहे . अशा व्यसनांधारी लोकांना व्यसनापासून दूर करणाऱ्या अनेक संस्था देशात कार्यरत आहेत . अनेक ठिकाणी या व्यसनाचे दुष्परिणाम सांगून त्यांना व्यसनापासून परावृत्त केले जाते . जनजागृती केली जाते. यावर योगासने, ध्यान, व प्राणायाम या द्वारे प्रचार करून त्यांचे व्यसन सोडविले जाते व त्यांना तंबाखू सोडा व आरोग्याची कास धरा याचे मार्गदर्शन केले जाते. निरोगी व अनादी आयुष्य जगण्यासाठी व्यसन मुक्ती हवी . व्यसनामुळे आरोग्याची व पैशाची सुद्धा हानी होते . त्याचा त्रास कुटुंबियांना होतो . हे सर्व टाळून व तंबाखू व्यसन दूर करून आरोग्यमय व आनंदी जीवन जगूया हाच संदेश या दिवसाचा आहे. आपले आयुष्य हे ईश्वरी वरदान आहे . या आयुष्याचा उपयोग आपण आनंद व मजेत घालवावयास हवा . याशिवाय व्यसन सोडल्याने पैसेही वाचू शकतील त्यासाठी आपणास कोणतेही व्यसन नको असे केल्यास एक सुदृढ व आनंदी पिढी तयार होईल व ते एक राष्ट्राचे वैभव ठरेल यात शंका नाही.

शांताराम वाघ, पुणे

# आठवले with आठवलये



भीमराव सरवदे
संपर्क क्र. 9405466441

आधुनिक केसरी

**यापूर्वी आठवणीचे पक्षी, बलुतं, उपरा, उचल्या, माझ्या जल्माची चित्तर कथा, कार्यकर्ता, अभ्रान, मला उध्वस्त व्हायचंय इत्यादी मी वाचलेल्या आत्मचरित्रामधून वेशीबाहेरील जगण्याचा आक्रोश, संघर्ष आणि् यवस्थेविरुद्धचा एल्गार ठासून भरलेला आढळून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले "वेटिंग फॉर ए विजा" हे आत्मचरित्र वाचल्यावर तर इथल्या कर्मठ चातुर्वर्ण्य व्यवस्थेने अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींना माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्कच कसे काढून घेतले होते, हे स्पष्ट होते. हा या देशाचा काळा इतिहास आहे. दुष्यंत आठवले यांचे आत्मचरित्र मात्र वेगळ्या धाटणीचे असल्याचे पदोपदी जाणवत राहते.**

त्यांच्याही आयुष्याची सुरुवात इतराप्रमाणेच जातीवादाचे चटके सहन करतच झालेली असली तरी त्यांचा संपूर्ण प्रवास एक यशस्वी बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणूनच पुढे पुढे सरकत जातो, जो आजच्या व येणाऱ्या पिढीतील तरुणांना भरारी घेण्यासाठी सकारात्मक ऊर्जेचा स्त्रोत आहे, असे वाटू लागते. या चरित्रामध्ये कुठेही आक्रस्ताळेपणा, अक्रोश, अथवा तिरस्कारच्या छटा आढळून येत नाहीत. त्यामुळे प्रख्यात उद्योगपतींच्या यशोगाथा वाचण्याचा जो फील येतो तोच फील हे पुस्तक वाचताना येतो. हेच या आत्मचरित्राचे मोठेपण आहे. पुस्तकात कुठेही फापट पसारा अथवा विपर्यास आढळून येत नाही. घटना व घटनाक्रम मांडताना वास्तवता ओतप्रोत भरलेली असल्यामुळे वाचनात तंद्रीभंग होत नाही. दलितत्वामुळे आयुष्यात कोंडमारा झाल्याची भावना या आत्मचरित्रात कुठेही आढळून येत नाही, उलट नवनव्या क्षितिजाकडे भरारी घेण्यासाठी संपूर्ण आकाश मोकळे असल्याचा संदेशच नव्या पिढीला दिला आहे. बालपणीच्या आठवणी सांगताना आठवले म्हणतात, तीन-चार वर्षाचा असताना देवबा मास्तरकडे खाजगी शाळेत शिक्षण घेत असताना इतर मुलांपासून वेगळे बसवले जात असे. पुढे जिल्हा परिषदेच्या शाळेतही वेगळेच बसवले जायचे. मराठा, माळी, साळी, तेली आदी जातीतील मुलं शूद्र असूनही आम्हाला जवळ करीत नसत. देवबा मास्तरच्या शाळेत दूर बसवले जात असले तरी मास्तरमुळे मी हुशार होतो हे कौतुक उल्लेखनीय आहे. पहिलीच्या वर्गात हुशार असूनही जातीयवादी मानसिकतेच्या शिक्षकांनी नापास केले होते, त्याबद्दल शिक्षकाला प्रश्न विचारण्याचे धाडस केले होते. बहुजनांच्या मुलांनी शिकू नये म्हणून हुशार असले तरी नापास करून त्यांच्या कोवळ्या वयात शिकण्याची उमीद खुडून काढण्याचे षडयंत्र तत्कालीन शिक्षक करीत असत. हा वास्तववादी आरोप अस्वस्थ करून जातो. वडील शिक्षक असल्याने पुढे बदलीच्या गावी शाळेत घातले. पुढे औरंगाबाद येथील शासकीय विद्यानिकेतन शाळेत पाचवीत प्रवेश घेतला. या शाळेत बालमनावर जे चांगले संस्कार झाले त्याचा वारंवार उल्लेख करून शाळेप्रती लेखक कृतज्ञता व्यक्त करतात. शिक्षणामुळे माणूस मोठा होतो. मलाही मोठे व्हायचे होते. तेथे जी शिस्त लागली ती संपूर्ण आयुष्य घडवण्यासाठी उपयोगी पडली. या शाळेत मात्र शिक्षकांनी कधी दुजाभाव केला नाही. असे आवर्जून नमूद केले आहे. सातवीत असताना बारड या मूळ गावी आजोबाचे निधन झाल्यामुळे जावे लागले. आजोबाच्या डोळ्यांना ज्वारीचे कणीस लागल्याने डोळे गेले होते. त्यामुळे त्यांची सेवा करण्यात धन्यता वाटत असे. आजी मात्र त्यांचे काही करताना कुरकुर करत असे. मी गावी गेलो तर सर्व रडारड सुरू होती. आजी इतर कोणाचेच ऐकत नव्हती. ज्याच्या त्याच्या गळ्यात पडून रडायची. कोणी चला आता उचला म्हटले की थांबा म्हणायची व गळा काढायची. लेखक म्हणतात, मी हिम्मत करून म्हटले, आजे! त्यांचे करताना कुरकुर करायचीच आणि आता गळा का काढतेस. माझ्या या बोलण्याने आजी भानावर आली. हा दुःखद प्रसंग हुबेहूब डोळ्यासमोर उभा राहतो, हे विशेष. नववीच्या वर्गात असताना कॅप्टनची निवडणूक लढवली व 180 पैकी 179 मते घेऊन निवडून आल्याचा हा प्रसंग वाचून भारी वाटते. दहावी पास झाल्यावर शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद येथे प्रवेश घेऊन शिक्षणानंतर विद्युत महामंडळात नोकरी करावी, असा विचार केला. कुटुंबात ज्येष्ठ असल्याने पटकन नोकरी करावी या उद्देशाने हा निर्णय घेतला होता. या ठिकाणी पहिल्याच दिवशी तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी रॅगिंग करत असताना बदडून काढले. त्यामुळे तिथे पुन्हा कधी कोणी रॅगिंग करण्याचे धाडस केले नाही. कॉलेज जीवन संपले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदविका हातात पडली. त्या काळात विद्युत महामंडळात ताबडतोब नोकरी मिळण्याची शक्यता होती, त्यामुळे नोकरीनंतर गाडी, बंगला, नोकरचाकर, ऐशआरामाचे जीवन जगण्याचे स्वप्न पहिले. भविष्यकाळ उज्वल व्हावा म्हणून दिनरात खस्ता खाल्ल्या, झटून अभ्यास केला; परंतु तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी झिरो बजेट जाहीर केले आणि सगळ्या स्वप्नांचा चुरडा झाला. सगळीकडे भरती बंद. वडिलांनी दुसरा संसार थाटलेला असल्याने व लेखक कुटुंबात ज्येष्ठ असल्याने त्यांना नोकरीची अत्यंत गरज होती. इंजिनियर झाल्यानंतर पहिला जॉब मिळाला तोही मजूर म्हणून औरंगाबाद येथील चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत एका औषधाच्या कंपनीत आठ रुपये रोजंदारीवर! पोटासाठी परिस्थिती सर्व काही शिकवते. तंत्रनिकेतनच्या शेवटच्या वर्षाला असताना वार्षिक परीक्षेची फीस भरण्यासाठी पैसे नव्हते. हॉल तिकीट रोखले होते. वडील कन्नड तालुक्यात लिंबाची चिंचोली येथे नोकरीवर होते. नवीन खटलं केल्यामुळे वडील नव्या संसारात रममान झाले होते. मुलगा काय शिकतो त्याला काही पैशाची गरज आहे का नाही हे ते सर्व विसरले होते. नात्यात दुरावा आला होता. वडील चांगल्या नोकरीवर असतानाही आर्थिक विवंचनेस तोंड देण्याची वेळ मुलावर आली होती. परिस्थितीने पुढे जाण्याचे शिकवले. मजूर म्हणून कामाला सुरुवात केली. पहिल्या महिन्याचा पगार 185 रुपये मिळाला. पुढे नोकरीचा शोध चालूच होता. अशातच एका कंपनीत इलेक्ट्रिकल इंजिनियर म्हणून मुलाखत दिली आणि निवडही झाली. पगार होता महिना रुपये 750. दोन वर्षे खूप मेहनतीने काम केले. कामाच्या व्यापामुळे एके दिवशी रात्री उशिरा सायकल वरून घरी जात असताना एका ऑटो रिक्षाने मागून खूप मोठ्याने धडक दिली. सायकलचा एक रॉड पायात घुसल्याने प्रचंड रक्त जात होते. लोक मर गया शायद असे म्हणून निघून चालले एवढ्यात, अरे मै जिंदा हू असे म्हटल्याने लोकांनी मग सरकारी दवाखान्यात नेले. दरम्यान रिक्षावाला पळून गेला होता. इथे या पगारावर समाधान नव्हते. मग मालकाच्या भावाने पुण्याला येतो का म्हणून विचारले. पगार रुपये चौदाशे देतो असे सांगितले. पुण्यातील ट्रान्स केअर कंपनी होती. गावोगावी दौऱ्यावर जावे लागत असल्याने इतरही पैसे मिळू लागले. दुसऱ्या वर्षी 1800 रुपये पगार झाला. बरे वाटले. पुढे 1989 ला पणजी येथे नव्यानेच उभारण्यात येणाऱ्या आकाशवाणी केंद्रात ज्युनिअर इंजिनियर म्हणून केंद्र शासनाची नोकरी मिळाली. पुण्यातील कंपनी सोडायला तयार नव्हती. हवे तर पगार वाढवतो म्हणाले; परंतु सरकारी नोकरी लागल्याच्या आनंदात कंपनीला नाही म्हणून सांगितले. गोव्यात राहण्याचे आकर्षण वेगळेच होते. गोव्याचे केंद्र उभारणीसाठी खूप मेहनत घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खूप कौतुक केले. मुंबईच्या एका कार्यक्रमात बेस्ट अभियंता म्हणून गौरविण्यात आले. एकदा एका ठेकेदारांनी निविदेप्रमाणे काम न करता बिल सादर केले. लेखकाने प्रामाणिकपणे काम करण्याचा वास घेतला असल्याने ते झिरो बिल म्हणून पुढे पाठवले. ठेकेदार व वरिष्ठही या त्यांच्या कृतीवर चिडले. विचारणा झाली. त्यांनी स्पष्ट सांगितले की, निविदेप्रमाणे काम न झाल्याने बिल देऊ शकत नाही. वास्तविकता अशावेळी पैसे घेऊन बिल काढण्याचा प्रघात असावा! म्हणूनच ठेकेदारांनी असे बिल सादर केले असावे. म्हणूनच तर अभियंता झाला की गाडी-बंगला लगेच होत असे; परंतु मी प्रामाणिकपणे काम करण्याचे ठरविलेले असल्याने अशा भ्रष्टाचारापासून दूर राहिलो. नंतर औरंगाबाद आकाशवाणी केंद्रात बदली झाली, नंतर नागपूर, राजकोट आदी ठिकाणी बदल्या झाल्या. राजकोटवरून अंदमान-निकोबारला बदली झाली. मुलाबाळांना तिकडे कसे घेऊन जावे हा विचार करत नोकरीचा राजीनामा देण्याचा विचार केला. पुढे इलेक्ट्रिकल ठेकेदार होण्याचा मनोदय व्यक्त करून राजीनामा देऊन औरंगाबाद गाठले. ज्या सरकारी नोकरीसाठी आयुष्यभर स्वप्न रंगविली त्या नोकरीवर पाणी सोडले. एक मन म्हणत होतं चूक केली तर दुसरं मन समजावत होतं की लाथ मारिन तिथे पाणी काढीन. आत्मविश्वास दांडगा होता. वाटेल ते कष्ट करण्याची मनाची तयारी होती. ठेकेदारीसाठी एक्सप्रेस इंजिनिअर्स म्हणून परवाना मिळवला. कामे मिळत गेली. पुढे शासकीय टेंडरही मिळू लागले. दोन वर्षात 28 लाखाचा टर्नओव्हर झाला. आकाशवाणीचा शेवटचा पगार रुपये 5500 होता. किती मोठी तफावत होती. म्हणजेच नोकरी सोडण्याचा निर्णय योग्य होता, हे सिद्ध झाले. या व्यवसायात जम बसतो न बसतो तोच शेती करण्याचे खूळ डोक्यात घुसले. शेतकरी विवंचनेत असताना, रोज शेतकरी आत्महत्या करत असल्याच्या बातम्या येत असताना हा विषय डोक्यात घुसला! निसर्गाची साथ नाही, सरकारचे लक्ष नाही, अशा अरिष्ठात सापडलेल्या शेती व्यवसायात पडायचे म्हणजे आयते मरण विकत घेणे, असे लोक बोलत होते. मनात घालमेल चालू होती. अभियांत्रिकेचे क्षेत्र सोडून चक्क शेती जगातील कुठल्याही शेतीचा अभ्यास केला तर ती तोट्यातच आहे, असे एकूण चित्र असताना मला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आठवले. बाबासाहेब म्हणाले होते की, शेती बरोबर जोडधंदा केला तरच ती फायद्यात राहते. पारंपरिकता, अज्ञान व मूढतेला फाटा देऊन उद्योगाची शेती पीकवायची, असा विचार करून शेती घेण्याचा इरादा पक्का केला. त्या अगोदर शेतीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. शेतीविषयक मासिकं-पुस्तकं विकत घेऊन भराभर वाचून काढली. जागरूकतेने शेती व्यवसायात पाऊल ठेवावे, हाच या पाठीमागचा विचार होता. राहुरी येथील कृषी विद्यापीठातील तज्ञांशी चर्चा केली. तेथील चिकूच्या लागवडीची विचारपूस केल्यानंतर आपले ज्ञान किती तोकडे आहे असे वाटले. भरपूर माहिती मिळाली. औरंगाबादला ठेकेदारी व पैठणला शेती असे कामात गुंतवून घेतले. **क्रमशः**

# असहमतीचे रंग : अशोक पळवेकर



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**अशोक नामदेव पळवेकर हे समकालीन वास्तवाचे वेगवेगळे प्रस्तर उलगडणारे आंबेडकरवादी जाणिवेचे कवी म्हणून मराठी साहित्यविश्वात ओळखले जातात. तसेच ते एक चिंतनशील समीक्षक म्हणूनही ख्यातकीर्त आहेत. १९८० सालापासून ते वेगवेगळ्या नियतकालिकांतून व साहित्यपत्रिकांतून सातत्याने काव्यलेखन करत आहेत. या दीर्घ कालावधीतील त्यांच्या काही निवडक कवितांचा (एकूण कविता १००) असहमतीचे रंग; हा त्यांचा काव्यसंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहातून सभोवतालच्या समकालीन वास्तवाचा एक व्यापक पट उलगडत गेलेला आहे. तसेच पळवेकरांच्या या कवितेतून सभोवतालच्या एकंदरीत मानवी जगण्याचे आणि समकालीन व्यवस्थेच्या वास्तवरुपाचे विवेकनिष्ठ चित्रण अगदी सहजीभावाने व चिंतनशील वृतीने आविष्कृत झालेले आहे.**

सामाजिक जाणिवेचे कवी व साहित्यिक म्हणून अशोक नामदेव पळवेकर यांची निश्चित अशी एक भूमिका आहे. मागील दोन तपापासून ते आपल्या आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. महाराष्ट्रातील चोखंदळ रसिक आणि साहित्यिक त्यांच्या या भूमिकेसंबंधी जाणून आहेतच. कवी अशोक नामदेव पळवेकरांची ही भूमिका प्रस्तुत काव्यसंग्रहातही कायम आहे. म्हणूनच आजच्या घडीला आपण सगळे भारतीय लोक आपल्या देशातील एतद्देशीय हुकुमशाहीवादाच्या प्रचंड वादळात सापडलेले आहोत!ही जाणीव ठेवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे आणि अशा वास्तवात आपली जबाबदारी झटकून कोणतीही ठोस भूमिका न घेणाऱ्या व अन्याय्य सत्तेच्या विरोधापासून अगदी नामानिराळे राहणाऱ्या लेखकवर्गाला त्यांनी खडे बोल ऐकवत त्यांचा; मृत्यू जाहीर केला आहे. ते म्हणतात मी माझ्या समकालीन त्या सर्व कवींना माझी श्रद्धांजली अर्पण करतोय जे बोलत नाहीत सर्वसामान्यांचे मरण डोळ्याने पाहूनही सिंहासनातील कुठल्याच दुर्गंधीच्या विरोधात - अशा सर्व लेखकवर्गाला त्यांनी आपली श्रद्धांजली अर्पण केली आहे. कारण जे लोक सर्वसामान्यांच्या दुःखाने कळवळत नाहीत, ज्यांचे शब्द राजसत्तेला घाबरून सर्वसामान्यांच्या दुःखाला वाचा फोडत नाहीत, त्या साहित्यिकांना त्यांनी त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. आजच्या वर्तमानात सर्वसामान्यपणे जे चित्र आपल्याला दिसते, ते फार भयानक आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या शीर्षक कवितेत आजच्या दडपशाहीचे व असहिष्णूवृत्तीचे स्वरूप सांगताना तू म्हणू शकत नाहीस पांढऱ्याला पांढरे किंवा काळ्याला काळे सध्या, असेच हे इथले वातावरण आहे! हे भयंकर वास्तव अधोरेखित करत त्यातील धोके नमूद केले आहेत. कारण जेव्हा सत्ता चूक असते; आणि तुम्ही बरोबर असता, तेव्हा तुम्हाला भयंकर धोका असतो, हे व्होल्तेअरने सांगितलेले वास्तव आजही सत्यच आहे! याच भयाने आज व्यवस्थेमध्ये सर्वसामान्य माणसाचे शब्द गोठले आहेत, सत्य बोलण्याची हिंमत उरलेली नाही. हे वास्तव जरी खरे असले, तरी कोणीतरी ही हिंमत दाखवलीच पाहिजे आणि त्यासाठी धर्मवादी राजसता आणि रूढ व्यवस्थेला काही प्रश्न विचारणारे, प्रसंगी त्यांच्याविरुद्ध उभे ठाकणारे विचारवंत व साहित्यिक पुढे आले पाहिजेत, असे कवीला वाटते. कारण ही जबाबदारी याच वर्गावर अधिक आहे. हीच भूमिका घेऊन कवीने आपली वाट चोखाळली आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून या देशात आपल्या धर्मनिरपेक्ष व लोकशाही समाजवादी व्यवस्थेने आपल्या राज्यघटनेनुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला त्याच्या जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन त्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य जगण्याचे हक्क व अधिकार बहाल केले आहेत. परंतु १९८० सालापासून या देशातील धर्मवादी विचारसरणीने मूलतत्त्ववाद आणि जमातवादी राजकारणाला खतपाणी घालत या स्वातंत्र्याच्या विरोधात सतत एक लोकमानस घडवण्याचा प्रयास चालवलेला आहे. आणि मूलतत्त्ववादी विचारसरणीचे लोक देशात सत्तेच्या केंद्रस्थानी आल्यानंतर तर या देशातील व्यक्ती आणि अभिव्यक्तीची सारखी गळचेपीच चालवली गेली आहे. त्यातून भारताच्या धर्मनिरपेक्ष व लोकशाही समाजवादी व्यवस्थेला मोठाच धोका उत्पन्न झाला आहे. हा धोका नष्ट करणे हे भारतीयांचे परम कर्तव्य आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत काव्यसंग्रहाचे मोल अधिक आहे. म्हणूनच अगदी प्रारंभापासून या देशातील धर्मवादी व्यवस्थेकडून सर्वसामान्य माणसाच्या अधिकाराचे हनन करून त्याचे शोषण अबाधित करण्याच्या ज्या जागा निर्माण केल्या गेल्या आहेत, त्या जागा आपण समजून घेणे पहिल्यांदा गरजेचे आहे. त्यासाठी या कवितासंग्रहातील काळ नसतो बदलत कधी! मी, जाहीर केलाय ईश्वराचा मृत्यू! ओ, जीनिअस डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिद्धार्थ गौतम बुद्ध भूक वगैरे तत्वचिंतनात्मक कवितांमधून डॉ. अशोक नामदेव पळवेकर यांच्या तत्त्वज्ञानाची व त्यांच्या जीवनदृष्टीची जी तात्त्विक बाजू स्पष्ट झालेली आहे ती आकळून अत्यंत घेणे गरजेचे आहे. तसेच अजेंडा अँटिक फरक एन्कौन्टर मी! असहमतीचे रंग भूमिका कबीराएक निवेदनअशा काही कवितांमधून त्यांची एक निश्चित भूमिकाही जाहीर झालेली आहे. याच भूमिकेने त्यांनी लेखकवर्गाला अन्याय्य सत्तेच्या व व्यवस्थेच्या विरोधात लढण्याचे आवाहन केले आहे, तेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्यांनी अविवेकीपणाने कोणत्याही गोष्टीचे उदात्तीकरण करणाऱ्या भक्तांच्या अविवेकी वृत्तीवर सडेतोड हल्ला चढवलेला आहे. कारण त्यांची श्रद्धा

अंधश्रद्धेचेच
एक विवर
असते काळे
त्यात ते राहतात
वळवळत कृमी
होऊन...
तेच त्यांच्या
जगण्याचे
आनंदतळे त्यांना
उजेडाचे फारच
असते वावडे ते
काळोखातच जगतात
आणि मरतातही
काळोखातच! असेच

त्यांचे वृत्ती- वर्तन असते, हे जाहीर केलेले आहे. या वृत्ती वर्तनापोटीच राजकारणातील भक्तीमुळे कोणत्याही राजकीय पंथात हुकुमशाहीची सत्ता प्रस्थापित होत असते. हा धोका भारतीय लोकशाहीला फार गंभीर स्वरूपाचा आहे. म्हणूनच मनू जातअळी जात अशा काही कवितांमधून जातीयतेचे विष हे मानव्यविरोधी व राष्ट्राच्या एकत्मातेविरुद्ध आहे हेही त्यांनी स्पष्टच केले आहे. कारण जाती ह्या राष्ट्रविघातक असून प्रत्येक जात व त्या जातीचे समूह हे स्वतःला राष्ट्रच मानत असतात आणि जात भांडवलाचा सतत गैरवापर करत असतात. हिंदू राष्ट्रवादाच्या मतप्रणालीचे समर्थक असलेल्या लोकांचा म्हणूनच जातिअंताच्या प्रक्रियेला कायम विरोध असतो. या विरोधाच्या विरोधातून उद्‌भवणारा संघर्ष हा अपरिहार्यच आहे; तो आपण नेटाने पुढे नेला पाहिजे, ही कवीची भूमिका आहे. डॉ. अशोक नामदेव पळवेकर यांच्या लेखनातील चिंतनाचे अनेक विषय आपल्याला ठाऊक आहेत. त्याशिवाय इतर विषयांना अनुसरूनही कविता लिहिली जाऊ शकते असे मराठी साहित्यविश्वात कुणालाही वाटले नसेल अशा जाणिवेच्याही काही कविता आपल्याला या काव्यसंग्रहात भेटतात. जसे पाहोम ही कविता. या कवितेत रशियन साहित्यिक लिओ टॉलस्टॉय यांच्या कथेला त्यांनी आधुनिक संदर्भ दिला आहे. समाजात मालकी हक्काची प्रचंड लालसा असलेली एक वृत्ती असते. त्या वृतीत कधीही एक न संपणारी तृष्णा एक असते. ती अलीकडच्या काळातही आहे. त्यामुळे आधुनिक काळात वाढत चाललेली ही तृष्णा आपल्याला आपल्या नैसर्गिक जगण्यापासून कशी परावृत्त करते, हे वास्तव सत्य टालस्टॉयच्या कथेचा संदर्भ देत कवीने त्या कवितेतून खूपच मार्मिकपणे सांगितलेले आहे. धनसंपत्तीच्या लालसेने जीवनाचे मर्म व जीवनातला आनंद विसरलेले वर्तमानातील लोक यांच्या मानसिकतेवर कवीने केलेल्या भाष्याची एक सुरेख गुंफण आपल्याला या कवितेत दिसून येते. तसेच पारधी, कबूतर आणि मुंगी यांच्या कथेविषयी या कवितेतही परोपकाराची जाणीव विसरलेल्या स्वार्थी व स्व-केंद्रित लोकांच्या मानसिकतेविषयी कवीने जळजळीत भाष्य केलेले आहे. जुन्या बोधकथांना काव्यात आधुनिक संदर्भ देण्याचे कवीचे हे कसब वाखाणण्याजोगे आहे. खरेतर, त्या कविता म्हणजे टी. एस. एलियट यांच्या जगप्रसिद्ध या निबंधाचे उपयोजित रूपच आहेत. वानगीदाखल त्यातील एक मूळ कविता वाचण्यासारखीच आहे. या कवितेच्या दुसऱ्या भागात ते म्हणतात अजूनही तिथे : झाड आहे. कबुतर आहे. मुंगी आहे. तळे आहे. आणि पारधीही आहे. पण, मुंगीला पाणी पिताना पाण्यात पडल्याचे पाहून कबुतर आता झाडाचे पान तोडत नाही. तिच्या पुढ्यात ते टाकत नाही. मुंगी पाण्यात बुडते. मरून जाते. कबुतर नामानिराळे...! पारधी येतो. कबुतरावर नेम धरतो. बाण मारतो. कबुतर खाली कोसळते. मरून जाते. पारधी शिकार उचलतो. निघून जातो. झाड मात्र अस्वस्थ. वर्तमान काळात स्व-केंद्रित वृत्तीने जगताना हरवलेल्या मानवी मनाची संवेदना व एकमेकांना मदत न करण्याची वृत्ती यामुळे व्यवस्था सतत आपला गैरफायदा घेते आणि आपला नाहक बळी जातो. हे परखड सत्य सांगताना एकेकाळी येथील माणसा-माणसामधील आपापसातील जिव्हाळा आणि स्नेह जवळून पाहणारे झाड म्हणजे तत्त्व आणि व्यवहार यांतील अनुबंध जपणारी पिढी व तत्व आणि व्यवहार **क्रमशः**



# मोदींच्या योजनेला विरोध हे विरोधकांचे धोरण आहे का ?



भीमराव सरवदे
संपर्क क्र. 9405466441

आधुनिक केसरी

**नविन संसद भवनाच्या उद्घाटनाला सर्व विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकत पुन्हा एकदा विरोधकांनी मोदींच्या धोरणाला कडाडून विरोध केला आहेसंसदेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन मोदी यांच्याऐवजी देशाचे राष्ट्रपती किंवा लोकसभा अध्यक्षांच्या हस्ते या इमारतीचे उद्घाटन केले जावे, अशी भूमिका विरोधकांनी घेतली आहे. त्यासाठी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमके, आम आदमी पार्टी (आप) या पक्षांसह एकूण २० पक्षांनी एकत्र येत संसदेच्या उद्घाटन कार्यक्रमावर बहिष्कार टाकला आहे. संयुक्त निवेदन जारी करत या पक्षांनी त्यांची भूमिका मांडली आहे. राजकीय हीत आणि निवडणुकीतील फायदा-तोटा लक्षात घेता विरोधी बाकावरील प्रादेशिक तसेच राष्ट्रीय पक्षांमध्ये बरेच मतभेद आहेत.**

यावेळी मात्र हे मतभेद दूर सारून अनेक पक्ष एकत्र आले आहेत. याआधीही मोदी सरकारचा विरोध करण्यासाठी अनेकदा हे पक्ष एकत्र आलेले आहेत. त्यांनी एकत्र येऊन एकजुटीने मोदी सरकारचा विरोध केलेला आहे.२०१४ पासूनच भाजपचे सरकार स्थापन होण्यापूर्वी पासूनच काँग्रेससह काही विरोधी पक्षांच्या वतीने नरेंद्र मोदींना विरोध करण्याची प्रक्रिया जी सुरू केली ती आजही सुरू आहे. ९ वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगातील सर्वात लोकप्रिय नेते झाले, पण देशातील विरोधी पक्ष आजही नरेंद्र मोदींच्या प्रत्येक पावलाला विरोध करत आहेत.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बिडेन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लोकशाहीचे सर्वात मोठे संरक्षक असे वर्णन केले आहे. आधी मोदींना मिठी मारली आणि नंतर ऑटोग्राफ मागितला. पापुआ न्यू गिनीच्या राष्ट्रपतींनी तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या चरणांना स्पर्श करून कोरोनाच्या काळात भारताने केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी नरेंद्र मोदींचे लोकशाहीचे सर्वात मोठे वॉचडॉग असे वर्णन केले आहे आणि त्यांना बॉस देखील म्हटले आहे. जग पण या पंतप्रधान नरेंद्र मोदींना त्यांच्याच देशात विरोधी पक्षांच्या नेत्यांकडून शिवीगाळ केली जात आहे. त्यांच्या प्रत्येक पावलावर विरोधी पक्ष निषेधाचे बिगुल वाजवू लागतात. प्रश्न पडतो की निषेध हा भारतीय राजकारणाचा भाग झाला आहे, हा मुद्दा योग्य की अयोग्य? सर्जिकल स्ट्राईकवर विरोधकांनी मोदी सरकारकडे पुरावेही मागवले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रत्येक योजनेवर विरोधकांनी कसा हल्लाबोल केला, हे त्याचे वैशिष्ट्य आहे. इतरही अनेक योजना आहेत ज्यांना विरोधी पक्ष आजपर्यंत विरोध करत आहेत. यामध्ये देशातील तपास यंत्रणा, सीबीआय, ईडी, आयटी याही भ्रष्टाचाऱ्यांवर कडक कारवाई करत आहेत. यामध्ये विरोधी पक्षांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर अशोभनीय टिप्पणी केली जात आहे. पुलवामा येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या घृणास्पद कृत्यानंतर नरेंद्र मोदी सरकारने पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांना ठार मारण्यासाठी सर्जिकल स्ट्राईक केले. पण गंमत म्हणजे देशातील विरोधी पक्षांनीही याचा पुरावा नरेंद्र मोदी सरकारकडे मागितला. पंतप्रधान म्हणून सत्ता स्वीकारल्यापासून मोदींना विरोधकांचा सामना करावा लागत आहे.सरकारच्या प्रत्येक धोरणावर विरोधकांनी टीका करत विरोध केलेला आहे.ही यादी फार मोठी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना विरोध करताना चहा विकणारा देशाचा पंतप्रधान होऊ शकत नाही, असेही म्हटले होते. गरिबांसाठी जनधन खाते उघडण्याच्या योजनेला विरोध,२०१६ मध्ये नोटाबंदीला विरोध, आता २००० च्या नोटा बंद केल्याचा विरोध गरीब महिलांना मोफत गॅस सिलिंडर देण्याच्या उज्ज्वला योजनेला विरोध, पीएम मोदींच्या स्वच्छ भारत अभियानाला विरोध, प्रत्येक घरात वीज पोहोचवणाऱ्या उजाला



योजनेला विरोध, केंद्र सरकारच्या अंत्योदय योजनेला विरोध,हवाई दलासाठी राफेल विमान खरेदीला विरोध, घोटाळ्याचा आरोप, CAA ला विरोध, पाकिस्तान आणि बांगलादेशातील छळलेल्या हिंदू आणि अल्पसंख्याकांना ( शीख, बौद्ध इ. ) भारतीय नागरिकत्व देण्याची योजना पाकिस्तानी, बांगलादेशी आणि रोहिंग्यांसारख्या घुसखोरांना देशात परत पाठवण्याच्या NRC योजनेला विरोध. याशिवाय मोदी सरकारच्या एनपीआरलाही विरोध केला जात आहे. शतकातील सर्वात मोठ्या जागतिक महामारीच्या काळात भारतात बनवलेल्या कोरोना लसीला विरोध करतानाही विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मागे हटले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही कोरोनाच्या काळात इतर अनेक देशांना मदत केली होती. मात्र या माणुसकीच्या कृत्यासाठीही त्यांना विरोधकांच्या विरोधाला सामोरे जावे लागले. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आणि उत्पन्न दुप्पट करण्यासाठी आणलेल्या कृषी कायद्याला विरोधकांनी कडाडून विरोध केला. मुस्लिम महिलांना सन्मान देण्यासाठी केंद्र सरकारने आणलेल्या तिहेरी तलाक कायद्याला अनेक न्यायालयीन निर्णयांनाही विरोधी पक्षांनी विरोध केला. नरेंद्र मोदी सरकारकडून अयोध्येत उभारण्यात येत असलेल्या भव्य राम मंदिराला विरोध, देशाविरुद्ध कट रचणाऱ्या दहशतवाद्यांच्या ( पीएफआय आणि इतर संघटनांचे दहशतवादी ) अटकेचा निषेध देशद्रोहींच्या अटकेचा निषेध काश्मीरसह देशातील अनेक राज्यांमध्ये दगडफेक करणाऱ्यांच्या अटकेला विरोध होत आहे केंद्र सरकार आणणार UCC ला विरोध, भाजपशासित राज्यातील अतिक्रमण हटवण्यास विरोध जम्मू-काश्मीरमधून ३७० हटवण्यास विरोध, जम्मू-काश्मीरमधून कलम ३५ A हटवण्यास विरोध, सैन्यात तरुणांच्या भरतीसाठी केलेल्या नव्या योजनेला विरोध, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाला विरोधक सुरुवातीपासूनच विरोध करत आहेत. २०२३ साली १४ पक्षांनी एकत्र येत मोदी सरकारकडून केंद्रीय तपास संस्थांचा गैरवापर केला जात आहे, असा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने अगोदर ही याचिका दाखल करून नंतर ती फेटाळली होती. ही याचिका तेव्हा काँग्रेस, डीएमके, तृणमूल काँग्रेस, आरजेडी, आप, बीआरएस, राष्ट्रवादी, शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ), जेएमएम, जेडीयू, सीपीएम, सीपीआय, समाजवादी पार्टी, नॅशनल कॉन्फरन्स या पक्षांनी दाखल केली होती. सध्या २८ मे रोजी होणाऱ्या नवीन संसद भवनाच्या उद्घाटनालाही विरोधी पक्षांकडून जोरदार विरोध बहिष्कार करण्यात आला आहे.

# घर तेथे झाड संकल्पना राबवावी!


आधुनिक केसरी

वाढत्या शहरीकरणामुळे जंगलाचा ऱ्हास होत चालला आहे .आज वाढत्या वृक्षतोडीमुळे वातावरणातील तापमानामध्ये वाढ झाली आहे. आपण जागतिक तापमानवाढीचे परीणाम भोगत आहोत. उन्हाळा, पावसाळा,हिवाळा म्हणू नका. केव्हा वादळ, वारा, अवकाळी पाऊस पडेल हे सांगता येत नाही. यावरूनच निसर्गाचा पुर्णपणे समतोल ढासळला आहे. चिन देशाने एक वर्ष पक्षांनी अन्नधान्य खाऊ नये यासाठी सर्व पक्षी मारण्याचा निर्णय घेतला.त्यामुळे त्या देशाची इकोसिस्टम बिघडली . त्यामुळे निसर्गाशी छेडछाड करण्याचा फटका चिनला बसला.यातुन आपण आता सर्वांनी बोध घेतला पाहिजे.निसर्गातील सजीवसृष्टी किती महत्वाची आहे.पक्षी ,प्राणी,हे निसर्गाचा समतोल राखत आहेत.पण त्यासाठी आता प्रत्येकाने घर तेथे झाड संकल्पना राबविली पाहिजे. वातावरणातील बदलामुळे वादळी वारे, अवकाळी पावसाचे प्रमाण वाढले आहे.दिवसेंदिवस झाडांची संख्या कमी होत चालली आहे.नुसते झाड लावून उपयोगाचे नाही. तर ते जगविणे महत्वाचे आहे. ज्या ठिकाणी झाडे आहेत अशा ठिकाणी संततधार पाऊस पडत आहे.ज्या ठिकाणी झाडांचे प्रमाण कमी आहे अशा ठिकाणी अतिवृष्टीला सामोरे जावे लागत आहे.

त्यामुळे प्रत्येकाने घर तेथे झाड लावणे गरजेचे आहे.पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे आहे.आपण जागतिक तापमानवाढीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यासाठी आपल्या जीवनात झाड खुप महत्वाचे आहे. एक एक झाड किती मोलाचे आहे. झाड अमुल्य आहे .एक झाड एका वर्षात १००किलो पर्यंत ऑक्सिजन देते. एका व्यक्तीस वर्षाला ७४० किलो ऑक्सिजनची गरज भासते. झाड एखाद्या भागाचे तापमान २ते ५अंशापर्यत कमी करु शकते.साधारण वर्षभरासाठी एक झाड २२किलो कार्बनडाय ऑक्साइड शोषून घेते.एका झाडाच्या सहाय्याने वार्षिक ३५००लिटर पाणी पाऊस पाडु शकतो. प्रत्येक झाड ३७००लिटर पाणी जमीनीत पोहचवते. यामुळे भुगर्भातील पाणी पातळी वाढते. घराच्या आजुबाजुला झाड लावल्याने एसीची गरज ३०टक्के कमी होते. यामुळे २०ते ३०टक्के विज बचत होते. शिवाय घरात येणारा गोंगाट ५०टक्केपर्यंत कमी होऊ शकतो. एक झाड ६ टक्क्यांपर्यंत धुर व धुके कमी करण्याचे काम करते.एक झाड ८०किलो पारा, लिथीयम, लेड विषारी धातू शोषून घेते. त्यामुळे माती कसदार व शेती करण्या योग्य होते. एका अभ्यासानुसार एक झाड लावल्याने पक्ष्यांच्या ८०पर्यंत प्रजाती आपण वाचवू शकतो. जगात २९९६ प्राणी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. यापैकी ८४प्राणी भारतामध्ये आहे.

आज एक एक झाड खुप महत्वाचे आहे.आज निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी अथक प्रयत्न करणे गरजेचे आहे.प्रत्येकाने घर तेथे झाड संकल्पना राबविली पाहिजे.नुसते झाड लावून उपयोगाचे नाही तर ते जगविणे देखिल खुप महत्वाचे आहे.

संतोष दत्तू शिंदे, मु.पो.काष्टी,
ता.श्रीगोंदा, जिल्हा, अहमदनगर



# बारावी झाली, पुढे काय ?



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**बारावीचे निकाल लागले.आजकाल अनेकांना ९०टक्के मिळतात. त्यांचे फोटो सत्कार, मुलाखती असे सारे सुरू असते.या जाहिरात बाजीला नको तितके महत्व आले आहे. याचा परिणाम कमी टक्के मिळालेल्या मुलांवर होतो. त्यांच्यात न्यून गंड निर्माण होतो.**

वास्तविक ही गुणाची टक्के वारी मुला मुलींच्या हुषारीची,बुध्दीमत्ते ची खरी ओळख नसतेच.आजच्या बोर्डाच्या परीक्षेचे स्वरूप,प्रारूप बघता परसेंतेज अन् इंटेलिजन्स याचा अर्था अर्थी फारसा संबंध नसतो.त्यामुळे कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनी निराश होण्याचे कारण नाही. आपले काय होईल या विचाराने खचून जायचे मुळीच कारण नाही. या बोर्डाच्या निकाला बरोबरच इंजिनियरिंग,मेडिकल याच्या राष्ट्रीय, राज्य स्तरावरील परीक्षांचे देखील महत्व वाढले आहे. या परीक्षा क्याक करणे( ही आजची भाषा! ) म्हणजे स्वर्ग गाठणे अशीही समजूत झाली आहे. या परीक्षा घेणारे मंडळ, प्राधिकरण बोर्डाच्या निकालावर अवलंबून राहत नाही यातच सारे काही आले!या परीक्षा साठी मुलांपेक्षा त्यांचे पालक जास्त धास्तावले असतात.ते मुलावर नको तितके दडपण देतात.या तणावामुळे मुलांचे नको तितके खच्चीकरण होते.मना सारखे यश मिळाले नाही तर त्यातून बाहेर येणे अनेक मुलांना जड जाते.अनेक पालक याचा विचार न करता मुलावर ओरडतात.अनेकांना इंजिनियरिंग,टेक्नॉलॉजी म्हणजे काय,त्यात विविध कोर्सेस मध्ये नेमके काय शिकवले जाते, त्याचा पुढील वाटचालीत करीयर साठी उपयोग काय हेही माहिती नसते!अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे असा हा एकूण प्रकार असतो. आजकाल तर पूर्वीच्या तुलनेत अनेक नवे विषय,कोर्सेस पुढे आले आहेत.सर्वच क्षेत्रात स्कोप आहे. संधी आहे,जर तुम्ही त्यात जीव ओतून मेहनत घेतली तर!एक क्षेत्र श्रेष्ठ,बाकी कमी प्रतीचे असे काही नसते. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी आपण शाळा कॉलेजात जे शिकतो त्यापैकी फार कमी उपयोगाचे असते,वापरले जाते.आपल्याला सतत नवनवे शिकावे लागते.तरच आपला निभाव लागणार. मला हे येत नाही,मी हे शिकलो नाही अशी भाषा आता कुणीच ऐकून घेणार नाही. येत नाही तर शिकण्याची तयारी हवी.इंजिनियरिंग,मेडिकल,या बरोबरच, मूळ विज्ञानाच्या सर्व शाखा,अर्थ शास्त्र,मॅनेजमेंट,हॉटेल,फॅशन इंडस्ट्री,सेवा क्षेत्र,संगीत, नृत्य,नाट्य, साहित्य,समाज शास्त्र,पर्यावरण,मानसशास्त्र, स्पोर्टस अशी किती तरी दालने नव्या पिढीला उपलब्ध आहेत. या सर्व क्षेत्रात आव्हान आहे,संधी आहे, उज्वल भविष्य आहे.प्रसिध्दी,अन् पैसा देखील आहे. त्यामुळे मुलांनी पुढील शैक्षणिक करीयरच्या





बाबतीत एकांगी विचार न करता,आपले स्नेही काय करतात,पालक काय जोर जबरदस्ती करतात याच्या नादी न लागता,आपल्याला काय आवडते, काय झेपेल, काय शक्य आहे,आपली एकूण परिस्थीती काय आहे,याचाच विचार करावा,अन् त्यानुसार निर्णय घ्यावा.एरवी इतरांच्या नादी लागून चुकीचा निर्णय घेतला तर पुढे पश्चाताप करावा लागेल.मग घड्याळाचे काटे उलटे फिरवता येणार नाहीत. बारावी पर्यंत, आपली क्षमता, आपली मर्यादा, आपली आवडआपल्याला समजली असते.तेव्हढे ज्ञान शालेय शिक्षणातून मिळाले असते.आपले निर्णय चुकले ट्री हरकत नाही.चुका करतच माणूस पुढे जातो,शिकतो.पावला पावलावर रिस्क असते.अडचणी येतात.त्यातूनच मार्ग काढीत पुढे जायचे असते. बारावी नंतरचा प्रवेश हा तुमच्या पर्सेंतेज वर अन् असलीच तर प्रवेश परीक्षेच्या रँक वर अवलंबून असतो.म्हणजे ही प्रक्रिया तुमची,आवड,तुमचे कौशल्य,तुमचे व्यक्तिमत्व याचा विचार करीत नाही.हा विचार तुमचा तुम्हालाच करावा लागतो.म्हणजे चांगले गुण असुनही तुम्ही वेगळा,इतरांना कमी प्रतीचा वाटणारा कोर्स निवडला तर इतरलोक काय म्हणतील याचा विचार गौण ठरतो. शेवटी आपले भविष्य आपल्या हातात असते. ते इतर कुणी ठरवायचे नसते. पैसा, प्रतिष्ठा याला फारसे महत्व नसते. अगदी कमी शिकलेल्या व्यक्ती देखील लाखो करोडो कमावताना आपण बघतो. पण ती मंडळी आनंदी,समाधानी असतात का हे महत्वाचे.खूप पैसा जवळ असूनही शेवटी तो उपयोगाचा नसतो हे करोना काळात आपण शिकलोच.ज्या कोर्स ने,शिक्षणाने आपल्याला आनंद लाभेल,शिकताना मजा येईल तो कोर्स निवडावा. ही निवड तशीही अंधरातली उडी( रिस्क )असते.आहे अनेक निर्णय यापुढे धाडसाने घ्यावे लागतात.निभावून घ्यावे लागतात. मग यशापयश जे काही पदरी पडेल ते आहे तसे स्वीकारण्याचे सामर्थ्य आपोआप लाभते. लहान पणी शाळेत शिकलेली एक कविता आठवते : हे घेऊ का ते घेऊ दुकान उचलून का नेऊ ?

अशीच संभ्रमावस्था बारावी नंतर कोर्स ची निवड करतानाही होते. न आवडलेले खेळणे आपण टाकून देतो. पण अशी धरसोड वृत्ती शिक्षण, करीयर ची निवड करतांना कामाची नसते.हा निर्णय पुढचा मागचा सारासार विचार करून घ्यायचा असतो.जबाबदारीने घ्यायचा असतो.आहे वेळी मोठ्याचा, त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली निर्णय घ्यायला काही हरकत नाही.ऐकावे जनाचे पण शेवटी करावे मात्र मनाचेच! या लेखाचा उद्देश नेमका सल्ला देणे हा नव्हताच,नाही..तर योग्य निर्णय घेण्यासाठी बारावी नंतरच्या उंबरठ्यावर उभ्या मुलांना आपला मार्ग आपणच ठरविण्यासाठी प्रवृत्त करणे हा होता.हे समजले की सारे समजले असे म्हणायला हरकत नाही.शुभास्ते पंथाना संतु!

# हर्सूल टी पॉईंट येथे तथागत गौतम बुद्धांचा पुतळा बसवा

## आंबेडकरीवादी संघर्ष समितीचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या वतीने हर्सुल टी पॉईंट येथे तथा गौतम बुध्दांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा या मागणीसाठी हर्सुल टी पाईंट चौकात धरणे आंदोलन करण्यात येवून त्याबाबतचे निवेदन विभागीय आयुक्तांना देण्यात आले. सदरील आंदोलनाचे नेतृत्व श्रावणदादा गायकवाड यांनी केले आहे. निवेदनामध्ये मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या औरंगाबाद दौऱ्यामध्ये हर्सुल टी पॉईंट येथे तात्काळ तथागत गौतम बुध्दांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यात येणार असल्याची घोषणा करावी, नसता त्यांना आंबेडकरी जनता महाराष्ट्रभर फिरु देणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच सदरची मागणी ही आंबेडकरी समाजाकडून गेली ०२ वर्षापासून सातत्याने केली जात आहे. परंतु, त्याकडे शासन, प्रशासनाने जातीय द्वेषभावनेतून दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. अलिकडेच मा. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे मागील आठवड्यात औरंगाबाद दौऱ्यावर असतांना हर्सुल टी पाईंट येथे राजमाता जिजाऊ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळे बसविण्यात येणार असल्याची घोषणा केल्याने आंबेडकरी समाजामध्ये असंतोष पसरला आहे. राजमाता जिजाऊ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल आम्हाला आदरच आहे. परंतू पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा औरंगाबाद शहरातील कोकणवाडी चौकात भव्यदिव्य असा पुतळा असून राजमाता जिजाऊ यांचा पुतळा कॅम्ब्रीज चौकात प्रस्तावित आहे. त्यामुळे हर्सुल टी पॉईंट येथे त्यांचे पुतळे बसविण्याची काहीही आवश्यकता नाही. काही राजकीय कार्यकर्त्यांनी सदर ठिकाणी त्यांचे पुतळे बसविण्यात यावे अशी निवेदनाद्वारे मागणी केल्याने मुख्यमंत्र्यांनी कुठलीही शहानिशा न करता घोषणा केली आहे. त्यामुळे ०२ समाजामध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. या सर्व परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेवून मा.ना. एकनाथ शिंदे यांनी औरंगाबादच्या दौऱ्यामध्ये हर्सुल टी पॉईंट येथे तथागत गौतम बुध्दांचा पुर्णाकृती बसविण्याची घोषणा करण्यात यावी, यासाठी समितीच्या वतीने आज दि. २५/०५/२०२३ रोजी तिव्र धरणे आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी धरणे आंदोलनामध्ये भन्ते धम्मकिर्ती, नानासाहेब शिंदे, किशोर गडकर, कैलास गायकवाड,, मनिष नरवडे,मोहनलाल गोरमे, सुनिल वाकेकर संतोष मोकळे, अशोक गरुड,



महेश तांबे, कॅप्टन बाजीराव सोनवणे, उत्तम जाधव, ज्ञानेश्वर खंदारे, कांचनताई सदाशिवे, संगिताबाई भालेराव, करुणाबाई पाईकडे, करुणाताई पाटोळे, भारती बनकर, शालिनी नरवडे, कांचन जाधव, विमल म्हस्के, संजय म्हस्के, बाळूभाऊ वाघमारे, पवन पवार, नवल सुर्यवंशी, शांतीलाल लसगरे, मदन भगुरे, किसन फुलमाळी, सुनिल खरात, अशोक सोनवणे, किशोर ससाणे, रतनकुमार साळवे, इंजि. विश्वजित गोणारकर, संदिप चांदणे, एस पी मगरे, मुकुंद दाभाडे, संभाजी साबळे, राजु होर्शिळ, अंकुश शिंदे, गौतम गवई, भाई प्रकाश जाधव, मोतीलाल त्रिभुवन, रामराव नरवडे, विजय मोरे, रवि रत्नपारखे, विजय दाभाडे, गणेश साबळे, बाबासाहेब सुरडकर, आर. पी. कुंभार, राहुल सरवदे, अशोक गवळे, विलास साळवे, ॲड. हर्षवर्धन प्रधान, मिलिंद गायकवाड, भगवान हिवाळे, किशोर थोरात, दिलीप चाबुकस्वार, राजु काळे, कृष्णा नरवडे, भिमराव पारधे, अर्जुन भुजंग, भानुदास वाघ, रवि शिंदे, आदीसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# सफाई कामगारांचा जटील प्रश्न लवकरच मार्गी :विठ्ठल पवार राजे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** राज्यातील अनेक ठिकाणी गोर गरीब कष्टकरी कामगारात काम करणाऱ्या सफाई कामगारांचा प्रश्न अत्यंत गंभीर बनलेला असून इमाने इतबारे काम करणाऱ्या, कायमस्वरूपी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवेत असणाऱ्या सफाई कामगारांना कमी करून त्या ठिकाणी खाजगी कामगारांची भरती करून अनेक प्रामाणिक कायमस्वरूपी सफाई कामगारांना वेटीस धरले जाते. मान. न्यायालयाचा निकाल आदेशही, सरकारी कलम कसाई बाबू लोक मानत नाहीत त्यांना वठणीवर आणण्यासाठी लवकरच अखिल भारतीय सफाई कामगार संघठना नवी दिल्ली, राष्ट्रीय अध्यक्ष विजयकुमार, राष्ट्रीय महासचिव एडवोकेट कबीर बिवाल, राज्य अध्यक्ष धनराज चावरीया यांच्या खंबीर नेतृत्वाखाली संघटनेच्या वतीने ज्या कामगारांवर अन्याय झालेला आहे त्यांना लवकरच परत कामावर रुजू करून घेण्यासाठी संघटनेच्या वतीने अथक परिश्रम करून त्यांना न्याय मिळवून देऊ असे आश्वासन संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश ग्रामीण अध्यक्ष विठ्ठल पवार राजे यांनी छत्रपती संभाजी नगर ( औरंगाबाद ) येथे पत्रकार पत्रकारांशी बोलताना दिले, यावेळी शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय सचिव युनूस आलम सिद्दिकी छत्रपती संभाजी नगर जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव, मराठवाडा विभागाचे अध्यक्ष प्रदेश संघटक श्री कदम तर प्रकल्पग्रस्त सफाई कामगार अरुणा राऊत बिपिन पाटोळे चंद्रकांत दाभाडे खलील खान मेहबूब खान इतर सफाई कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य शरद जोशी विचारमन शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकरी संवाद यात्रा शेतकरी कष्टकरी कामगार सहकार बचाव आंदोलनाच्या वतीने राज्यभर संवाद यात्रेचे आयोजन संघटनेच्या वतीने करण्यात आलेले आहे, अहमदनगर नेवासा येथील शेतकरी मेळावा ऊस परिषदेच्या नंतर अध्यक्ष विठ्ठल पवार राजे हे छत्रपती संभाजीनगर येथे शासकीय कामानिमित्त मराठवाडा दौऱ्यावर असताना शासकीय सुभेदारी शासकीय विश्रामगृहावर थांबले असता औरंगाबाद येथील प्रकल्पग्रस्त सफाई कामगार श्रीमती अरुणा राऊत, बिपिन पाटोळे, चंद्रकांत दाभाडे, खलील खान मेहमूद खान यांनी त्यांची भेट घेतली व सफाई कामगारांवर होत असलेल्या अन्याया बाबतची माहिती दिली त्यावेळेस त्यांनी उपस्थित कामगारांना आस्वस्थ केले. अन्यायग्रस्त सफाई कामगारांनी कोणतीही चिंता करू नये तुमच्यावर झालेल्या अन्याय निश्चितपणे दूर करून तुम्हाला न्याय मिळवून दिला जाईल, दिन दुबळे व दलित गोर गरीब सफाई कामगारांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देणे हे अखिल भारतीय सफाई कामगार संघटन नवी दिल्ली यांचे कर्तव्य व कार्य असल्याचे यावेळी अध्यक्ष विठ्ठल पवार राजे यांनी उपस्थित सफाई कामगारांना सांगितले. सफाई कामगार संघटनेच्या वतीने लवकरच उच्चस्तरीय बैठक घेऊन अन्याय झालेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेऊन कुठल्याही कामगारावर अन्याय होणार नाही अशा पद्धतीने अखिल भारतीय सफाई कामगार संघटना नवी दिल्ली हे कार्यरत असते असेही यावेळी विठ्ठल पवार राजे यांनी छत्रपती संभाजी नगर सिडको एन वन येथे एका खाजगी कार्यक्रमाला गेले असतात त्यांनी उपस्थित पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# क्रस्ना डायग्नोस्टिकच्या अत्याधुनिक टेली रेडिओलॉजी हबला एनएबीएचचे प्रमाणपत्र

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** क्रन्सा डायग्नोस्टिकच्या पुणे स्थित अत्याधुनिक टेली रेडिओलॉजी हब ला केंद्र शासनाच्या नॅशनल ॲक्रिडिएशनमुळे बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्सचे ( एनएबीएच ) प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे. `टेली रेडिओलॉजी हब` ला `एनएबीएच`चे प्रमाणपत्र मिळवणारी `क्रस्ना` ही भारतातील पहिली डायग्नोस्टिक कंपनी ठरली आहे. केंद्र शासनाची एनएबीएच ही संस्था आरोग्य क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण सेवांसाठी रूग्णालये व आरोग्य सेवेतील संस्थांना ॲक्रिडिएशन प्रदान करते. त्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार टेली रेडिओलॉजी हबमध्ये आवश्यक त्या सर्व गुणवत्ता प्रक्रियांच्या माध्यमातून तपासण्या व अचूक रिपोर्टस् बनवले जातात. रेडिओलॉजी, पॅथॉलॉजी, टेली रेडिओलॉजी तसेच कॅन्सरशी संबंधीत अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सर्व प्रकारच्या रोगनिदान चाचण्या सामान्य रूग्णांना आवाक्यातील किंमतीमध्ये उपलब्ध करून देणारी डायग्नोस्टिक कंपनी म्हणून क्रस्ना डायग्नोस्टिकची देशभर ओळख आहे. क्रन्सा डायग्नोस्टिक विविध राज्य सरकारे तसेच महानगरपालिका यांच्याशी संबंधित पीपीपी म्हणजेच पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपद्वारे गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देणारी एक अग्रणी कंपनी आहे. पीपीपी स्वरूपात देशभरात १७ राज्यांमध्ये तीन हजारांहून अधिक केंद्रांसह कार्यरत असलेली क्रस्ना ही काम करणारी एकमेव कंपनी आहे. आपल्या रोगनिदान केंद्र व सेवांना सर्वाधिक संख्येने एनएबीएचचे ॲक्रिडिएशन मिळवणारी क्रस्ना देशातील एकमेव व पहिली कंपनी आहे. ही गोष्ट क्रस्ना डायग्नोस्टिकची गुणवत्तापूर्ण कामगिरी दर्शवते. देशभरातील विविध राज्यांमधील क्रस्नाच्या केंद्रांमधून रूग्णांच्या केल्या जाणाऱ्या सीटीस्कॅन, एमआरआय, एक्सरे चाचण्यांचे अचूक रिपोर्टस् पुणे स्थित अत्याधुनिक `टेली रेडिओलॉजी हब` च्या माध्यमातून सुमारे दोनशे हून अधिक रेडिऑलॉजिस्ट अगदी काही तासांमध्ये अभ्यास करून त्याचे संबंधीत रूग्णांना उपलब्ध करून देतात. अशा प्रकारे `टेली रेडिओलॉजी हब` च्या माध्यमातून सेवा देणारी ही क्रस्ना डायग्नोस्टिक ही एकमेव कंपनी आहे. क्रस्ना तर्फे देशभरातील केंद्रांमधून प्रत्येक दिवसाला ५ हजारांहून अधिक व महिन्याला १ लाख ५० हजारांहून अधिक सीटीएमआर केले जातात तर प्रत्येक दिवसाला २० हजारांहून अधिक व महिन्याला ५ लाखांहून अधिक क्ष किरण ( एक्स रे ) केले जातात. एवढ्या मोठ्या संख्येने होणाऱ्या रोगनिदान चाचण्यांचे रिपोर्टस् अवघ्या काही तासांत या अत्याधुनिक या `टेली रेडिओलॉजी हब` च्या माध्यमातून होतात. सामान्य रूग्णांना अगदी आवाक्यातील किंमतींमध्ये रोगनिदान चाचण्या उपलब्ध करून देण्याच्या आमचे प्रारंभापासूनचे ध्येय आहे.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
❊ मासिक पाळी अनियमित असणे
❊ हॉर्मोन्स चे असंतुलन
❊ मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
❊ PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
❊ मासिक पाळी बंद होणे
❊ वारंवार गर्भपात होणे
❊ श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
❊ शुक्राणु कमी असणे
❊ शुक्राणुची गती कमी असणे
❊ शुक्राणु स्खलन
❊ स्वप्न दोष
❊ सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# 10 जून रोजी नागपुरात सैन्यभरती मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** सैन्यदल भरती नागपूर कार्यालयाने वेगवेगळ्या पदांसाठी अग्निवीर भरतीचा कार्यक्रम सोमवारी जाहीर केला. जनरल ड्युटी, तांत्रिक आणि लिपिक पदासाठी १० जून २०२३ पासून नागपुरात भरती मेळावा होत आहे. पहिल्या फेरीत पात्र उमेदवारांची वैद्यकीय चाचणी २५ ते १७ जून २०२३ दरम्यान घेतली जाईल. विदर्भांतील ( बुलडाणा जिल्हा वगळून ) पात्र पुरुष उमेदवारांसाठी सैन्य भरती मेळावा विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर, नागपूर येथे १० जून २०२३ ते १७ जून २०२३ या कालावधीत आयोजित केला जाईल. मेळाव्यात सहभागी होण्यासाठी निवडलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशपत्रे संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहेत.




# कुमकरहत्येचा तपास सीबीआयकडे सोपवा

## नातेवाईकांची मागणी; समाज बांधवांचे राजुरात धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथील माजी सरपंच स्व. गोरक्षनाथ आत्माराम कुमकर यांची हत्या होऊन एक महिना उलटूनही पोलीस प्रशासन आरोपीना पकडू शकले नाहीत. त्यामुळे पोलिस तपासात कसूर करत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. सदरील गुन्ह्याचा तपास सीबीआयकडे सोपवावा अशी मागणी सकल कुणबी समाज बांधवांनी केली आहे. राजूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात धरणे आंदोलनाच्या माध्यमातून निषेध नोंदवत स्व.कुमकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

माजी सरपंच गोरक्षनाथ आत्माराम कुमकर यांची सात मे रोजी आठवडी बाजाराच्या दिवशी चनेगाव रोड येथे घराच्या बांधकामाच्या ठिकाणी अज्ञात हल्लेखोरांनी कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केली होती.यावेळी घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक अक्षय शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी इंदलसिंह बहुरे, स्थानिक गुन्हे शाखेचे सुभाष भुजंग,सहायक पोलिस निरीक्षक वैशाली पवार यांनी भेट देत माहिती घेतली होती.घटना स्थळावरून काही अंतरावर पोलिसांना कुऱ्हाड सापडली होती. याचदिवशी रात्री उशिरा मुलगा आशुतोष कुमकर याच्या फिर्यादीवरून राजूर पोलिसात खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.मात्र पोलीस आरोपीना अटक करू शकले नाहीत. हा तपास सीबीआय मार्फत करावा अशी मागणी आंदोलन प्रसंगी करण्यात आली.मारेकऱ्यांचा लवकरात लवकर शोध घेऊन कठोरात कठोर शिक्षा व्हावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा प्रशासनाला देण्यात आला. तर गुन्हेगारांचा तपास योग्य दिशेने चालू असून लवकरच मारेकऱ्यांना अटक केली जाईल असे हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार यांनी सांगितले.

या आंदोलनात ऍड.राम कुऱ्हाडे, जिल्हा परिषद सदस्य जगनराव डोळस, राम सावंत, अंकुश घाडगे,सरपंच निवृत्ती शेवाळे,माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग,मेस्टा अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, माजी जि. प.सदस्य रामेश्वर सोनुने, ग्राम पंचायत सदस्य विनोद डवले,आप्पासाहेब पुंगळे,राहुल दरख, पंढरीनाथ करपे, रामेश्वर टोंपे, राजूर अर्बनचे कैलास गबाळे, अर्जुन मांगडे, परमेश्वर कुमकर,गणेश पुंगळे,किरण पंडित,राम ठोकळ, बळीराम टेपले,भगवान सुद्रीक यांसह ग्रामस्थ,समाज बांधव ,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी स्व. कुमकर यांना नातेवाईक आणि ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# शब्द शंकरपाळी साहित्य स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**दादर :** शब्द शंकरपाळी साहित्य समूह, मुंबई. या साहित्यिक संस्थेचा वार्षिक स्नेहसंमेलन आणि साहित्यिकांचा गुणगौरव सोहळा रविवार दिनांक २८ मे २०२३, रोजी सकाळी ठीक १० वाजता दादर येथील छबिलदास हायस्कूल या ठिकाणी अगदी उत्साहात संपन्न झाला. खरतरं सदर कार्यक्रमाचा विस्तार पाहता हा पुरस्कार वितरण समारंभ कार्यक्रम फार मोठा होता पण समूह संस्थापक माननीय भूषण सहदेव तांबे आणि त्यांचे जवळचे सहकारी मित्र रामचंद्र कळंबाटे यांनी अगदी सुरेख पद्धतीने व्यवस्थापन करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे लाभले ते म्हणजेच मराठी साहित्य क्षेत्रातील प्रसिद्ध युवा कवी प्रदीप बडदे. या स्नेहसंमेलन आणि राज्यस्तरीय गुणगौरव पुरस्कार वितरण समारंभसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून वेगवेगळ्या जिल्ह्यातून अनेक पुरस्कारप्राप्त मान्यवरांनी आवर्जून हजेरी लावली आणि या कार्यक्रमाची शोभा आणखीन वाढवून आनंद द्विगुणित केला. पुरस्कारप्राप्त साहित्यिकांना त्यांच्या विविध प्रकारच्या श्रेणीनुसार नामांकन मिळाले आणि त्या मान्यवरांना सन्मानचिन्ह, मेडल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्व मान्यवरांनी ठरलेल्या वेळीच कार्यक्रम ठिकाणी उपस्थित राहून संस्थेला अपेक्षित सहकार्य केले आणि कार्यक्रमाची शोभा वाढवली. जगभरातील सर्व साहित्यिकांना या कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी याचे थेट प्रक्षेपण ऑनलाईनसुद्धा करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रारंभ होणाऱ्या दीपप्रज्वलनापासून, मार्गदर्शन, मनोगत, गुणगौरव सोहळा ते थेट आभारप्रदर्शनापर्यंत होणारा प्रत्येक क्षण हा सर्वांच्याचं आयुष्यातील अविस्मरणीय क्षण होता. अगदी उत्सहात साजरा होणारा या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुण्यांनी देखील खूप छान मार्गदर्शन केले सोबत पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे आणि संस्थेचे खूप कौतुक करून त्यांच्या पुढील कार्यासाठी अंनत शुभेच्छा दिल्या.

# स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील सावरकर सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांची १४० वी जयंतीदिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमीत्त सावरकर वाचनालयात स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या प्रतिमेचे पुजन भाजपा तालुकाध्यक्ष तथा नगराध्यक्ष मा.श्री. सुहासभाऊ शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, विलास काळे, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड हे उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना सुहासभाऊ शिरसाठ म्हणाले की, "आज सावरकरांच्या जयंती दिनी देशाला नविन संसद भवन मिळत असुन सावरकरांच्या विचारांचा मोठा लाभ देशाला होणार आहे. सावरकर आपली प्रेरणा असुन त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याने देश आणखी प्रगती पथावर जाणार असेही ते शेवटी म्हणाले. या प्रसंगी माजी नगरसेवक डॉ. चंद्रशेखर पालकर, उद्योजक विष्णुशेठ वानखेडे, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण पिंजारी, मदन गुरजी जोशी, प्रा.सुधाकर जाधव, डॉ. मंदार मुळे, अमोल काळे, भीमराव मामा पाथ्रे, बेळे महाराज, डॉ.भालचंद्र पुजारी, एकनाथ धटींग वारेगावकर, बेळे गुरुजी, आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे सचिव सुर्यकांत उबाळे यांनी सर्वांचे स्वागत केले तर संस्थाध्यक्ष मनोज मुळे यांनी सर्वांचे प्रती ऋण व्यक्त केले.



# "राजमाता जिजाऊ घरकुल योजना" सुरु करा : सोनाली धाटबळे

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथे महिलांनसाठी राजमाता जिजाऊ घरकुल योजना तसेच रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक लाभ घरकुल योजनेच्या कार्यपध्दतीने लाभ दयावा. राज्यात सध्या केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनांअंतर्गत विविध घटकांतील बेघर लाभार्थींना घरकुल योजनांचा लाभ दिला जातो. परंतु या योजनांच्या प्रतिक्षायादीत महिला लाभार्थी खुप खालच्या क्रमांकावर असल्याने त्यांना लाभ मिळेपर्यंत योजनेचा लाभ बंद होतो किंवा लवकर लाभ मिळत नाही. म्हणुन सर्व घटकांतील बेघर महिलांसाठी राज्यपुरस्कृत "राजमाता जिजाऊ घरकुल योजना" सुरु करावी.

तसेच राज्यात रोहयो अंतर्गत सिंचन विहीर, जनावरांचा गोठा, फळबाग लागवड व ईतर वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. या योजनेचे लाभ मंजुर करताना मोठ्या प्रमाणात अनियमितता होते. यासाठी घरकुल योजनांप्रमाणे रोहयो लाभार्थींची लाभनिहाय कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी तयार करावी व शासन स्तरावरुन प्रत्येक लाभाचे लोकसंख्येनुसार लक्षांक निश्चीत करुन सदर लाभ मंजुर करणे बंधनकारक करावे. जेणेकरुन पंचायत समिती स्तरावरुन लाभ मंजुर करताना अनियमितता होणार नाही व खऱ्या व योग्य लाभार्थींना न्याय मिळेल. अशा प्रमुख दोन मागण्यांचे निवेदन सौ.सोनाली योगेश धाटबळे यांनी मुख्यमंत्री महोदयांना दिले.

# जवाहर विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** तालुक्यातील वाडी बु.येथील जवाहर माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचा २०२३ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.



शाळेतील ४५ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले आहे. यामध्ये कला शाखेमध्ये कु. निकिता सतिश लोखंडे. हि विद्यार्थीनी मागासवर्गीय विभागामधून 70 % 50 घेऊन जवाहर विद्यालय मधून विशेष प्राविण्य मिळवून यश संपादन केले आहे.या यशाबद्दल संस्थेचे सचिव लक्ष्मणराव दळवी ,अध्यक्ष योगेश दळवी ,प्राचार्य पी.इ.शिंदे ,प्रशासकिय अधिकारी आनंद वाघ ,प्रा. पी.पी.वाघमारे ,श्रीमती प्रा. जी .एल दळवी प्रा.ए.पी.झिने ,प्रा. बी.आर. वाघमारे, प्रा.एम.ए.रगडे ,प्रा.पी. टी. तेलगें अभिनंदन करुन सर्व शिक्षक व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या .



# पाथ्री येथे संभाजीराजे भोसले यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** जळगाव येथे जात असताना पाथ्री येथे पाथ्री तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले. प्रमुख उपस्थिती जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष द्वारका भाऊ पाथ्रीकर हभप कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर योगेशभाऊ पाथ्रीकर वसंतराव पाथ्रीकर संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते समस्त ग्रामस्थ गावकरी मंडळी उपस्थित होते.



# छत्रपती संभाजी राजे यांचे पहूरनगरीत जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जामनेर तालुक्यातील पहूर येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेरावे वंशज श्री छत्रपती संभाजी राजे यांचे आज रविवारी पहूर नगरीत जंगी स्वागत करण्यात आले. पहूर नगरीत आगमन होताच श्री छत्रपती संभाजी राजे यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल कुणबी मराठा समाजाच्या वतीने प्रथमतः निर्मला पवार , कल्पना पाटील , सुनिता पाटील , उषा पाटील यांनी मंगल तिलक लावत औक्षण केले. यावेळी सकल कुणबी मराठा समाजाचे संतोष चिंचोले यांनी स्नेहवस्त्र व पुष्पमाला देऊन छत्रपती संभाजी राजे यांचे स्वागत केले . तसेच श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी स्वागत करून मंदिराचे पत्र दिले. याप्रसंगी जिल्हा परिषद माजी कृषी सभापती प्रदीप लोढा, माजी पंचायत समिती सभापती बाबुराव घोंगडे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजधर पांढरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती वासुदेव घोंगडे, धनगर समाज उत्तर महाराष्ट्र प्रमुख रामेश्वर पाटील, सरपंच पती शंकर जाधव, माजी सरपंच लक्ष्मण गोरे, उपसरपंच राजू जाधव, दत्तू जाधव, रोजगार हमी योजनेचे तालुका अध्यक्ष समाधान पाटील, शरद बेलपत्रे, मनोज जोशी, किरण जाधव, शंकर भामेरे, दिपक पाटील, संजय तायडे, संजू पाटील, निलेश जाधव, मुकेश पाटील यांच्यासह शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . छत्रपती संभाजी राजे यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर आज वाघुर पुलावर भगवे ध्वज उभारण्यात आले होते .

# सोयगाव येथील राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे शानदार उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथील छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळ व क्रीडा भारती यांच्या सयूंक्त विद्यमाने सोयगाव येथे जालना खासदार चषक अंतर्गत राज्यस्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धेचे शनिवारी ( दी.२७ ) मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी राज्यातील व बाहेर राज्यातील एकूण २४ संघ सहभाग नोंदविला.या स्पर्धेचे उदघाटन छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे,विदर्भ कबड्डी असोसिएशनचे सचिव बापू देशमुख,महावीर थानवी, एपीआय अनमोल केदार व राज्य उत्पादन शुल्कचे पोलीस उपनिरीक्षक रतन फूसे, यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ६१ हजार रुपये व जालना खासदार चषक,द्वितीय बक्षीस ३१ हजार रुपये व अनिल मानकर यांच्यातर्फे चषक, तृतीय बक्षीस १५ हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेत जळगाव, नाशिक, मुंबई, सोलापूर, खामगाव, हरियाणा व छत्रपती संभाजीनगर येथील २४ कबड्डी संघांनीसहभाग घेतला आहे. स्पर्धेत सहभागी असलेल्या बाहेर गावावरून येणाऱ्या खेळाडूच्या निवास व भोजनासाठी राहण्याची व भोजणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी साठी क्रीडा भारतीचे अधिकृत पंच म्हणून बळवंत पाटील, उदय करहाळेकर,सुधीर पोतदार, रमेश कोल्हे, काकासाहेब कोल्हे व ज्ञानेश्वर सावंत हे मैदानावर काम पाहत आहेत. या कबड्डी स्पर्धेसाठी छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळाचे माजी खेळाडू आनंदा इंगळे, आबा पवार, विकास चौधरी, ज्ञानेश्वर वाडेकर, संदीप सुरडकर, करीम देशमुख, गोविंदा सोनवणे, अलिखा पठाण, भूषण पवार, दीपक बनकर, भरत पगारे, भगवान रोकडे, दिलीप पायघन, गणेश दुसाने, कैलास काळे, नाना वामने, अविनाश पाटील, रतन फूसे,जुमनाके, अनिल रोकडे, दत्तू काटोले,कमलेश काळे, निलेश गाडेकर, शेख दिलीप, दत्तू पोटदुखे व समाधान काळे हे अथक परिश्रम घेत आहेत.



# वैजापुरात जेष्ठ नागरिकांचे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर व राणा प्रतापसिंह याना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्त व हिंदू सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त रविवार( ता.२८ )रोजी आधार जेष्ठ नागरिक सेवा संघाच्या वतीने शहरातील जेष्ठ नागरिकांनी संत तुकाराम महाराज सभागृहात एकत्र येत अभिवादन केले. आरंभी जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी व जेष्ठ नागरिक रवींद्र साखरे यांनी अनुक्रमे वि.दा. सावरकर व महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमाना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले,जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी या दोन्ही महापुरुषांच्या जीवन कार्यावर थोडक्यात प्रकाश टाकून जेष्ठ नागरिकांना अशा महापुरुषाच्या कार्यक्रमात उपस्थित राहून आपल्या परिवारातील छोट्या मुलांवर राष्ट्रीय, सामाजिक, नैतिक संस्कार करून राष्ट्रीय मूल्ये बिंबविण्याचे आवाहन केले. प्रार्थना व प्रसातविक जेष्ठ नागरिक उत्तमराव साळुंके यांनी केले. आभार आधार जेष्ठ संघ चे अध्यक्ष अण्णा साहेब शेळके यांनी मानले. याप्रसंगी ज्या जेष्ठ नागरिकांचे या महिन्यात वाढदिवस आहेत. त्यांचा शाल व गुलाब पुष्प देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. या प्रसंगी जेष्ठ नागरिक सोन्याबापू गावडे, दगु वाणी, साहेबराव साळुंके, कृष्णा काबळे, प्रेमसिंह राजपूत, काळे मामा, पोपट भोसले, वैजीनाथ मिटकरी, सचिन सूरजमल राजपूत, डी.आर. धामणे, शेळके यांच्या सह जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर